पुणे. वर्ष १७ वे. सेप्टेंबर २०२१. अंक नववा
पृष्ठसंख्या: ३२. किंमत : रुपये ५०. वार्षिक वर्गणी : रुपये ५००

# जलसंवाद

पाणी प्रश्नावर मंथन घडवून आणण्यासाठी
व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे मासिक
संपादक: डॉ. दत्ता देशकर, श्री.सतीश खाडे

## शिरपूर पॅटर्नचे उद्गाते श्री. सुरेश खानापूरकर यांचे अभिष्ट चिंतन... नाबाद ७५






*Exclusive*

# KITCHENS & INTERIORS

BLISSMEDIA.IN

**KLASSY KITCHEN**

**SHOWROOM**
Shop No. 4, Avadhoot Apartment,
Near New India School, Right Bhusari Colony,
Paud Road, Kothrud, Pune 411038

**ABHAY AMBHORKAR**
Call : 99223 99933
E-mail : klassykitchen@gmail.com

# जलसंवाद

भारतीय जलसंस्कृती मंडळ, औरंगाबाद पुरस्कृत

- सप्टेंबर २०२१

- संस्थापक संपादक
  डॉ. दत्ता देशकर
  कै. प्रदीप चिटगोपेकर

- वर्तमान संपादक
  डॉ. दत्ता देशकर - ०९३२५२०३१०९
  श्री. सतीश खाडे - ०९८२३०३०२१८

- मुखपृष्ठ व सजावट
  अजय देशकर

- अंतर्गत मांडणी व अक्षर जुळवणी
  आरती कुलकर्णी

- वार्षिक वर्गणी : १०० /-
  पंचवार्षिक वर्गणी : रू. २००/-
  दशवार्षिक वर्गणी : रू. ३०० -

- या मासिकाची वर्गणी खालील खात्यात जमा करावी खात्याचे नाव: जलसंवाद, बँकेचे नाव : जनता सहकारी बँक, बाणेर, पुणे, खाते क्रमांक : ०४०२३०१०००००००३७, IFC Code : JSPB००००४० वर्गणी प्राप्त होताच अंक व्हॉट्सअॅप ने किंवा मेल ने पाठविला जाईल.

- जाहिरातींचे दर : पूर्ण पान रू. २०००/-
  अर्धे पान रू. १,०००/- पाव पान रू. ५००/-

- आपण dgdwater@okaxis वर सुध्दा वर्गणी भरू शकता

## अनुक्रमणिका

- **संपादकीय** / ४
- **सुरेश खानापूरकर - एक चांदण्याने भारलेले झाड**
  श्री. शरद. द. मांडे/ ५
- **शिरपूर पॅटर्न चे जनक श्री. सुरेश खानापूरकर**
  पाशा पटेल / ९
- **श्री. खानापूरकर यांना हार्दिक शुभेच्छा !!**
  श्री. संजय झेंडे / १३
- **पाणी आणि सुरेश खानापूरकर**
  श्री. अनिल पाटील / १६
- **मागे वळून पाहताना**
  सौ. सुमेधा सुरेश खानापूरकर / १८
- **एका दृष्टीक्षेत्रात शिरपूर पॅटर्न** / २१
- **पाणीदार माणूस**
  श्रीमती मीरा धाराशिवकर / २२
- **हेची फल का मम तपाला ?**
  डॉ. दत्ता देशकर / २४
- **खान्देशात राबणारा वैदर्भीय भगीरथ**
  श्री. प्रकाश एदलाबादकर / २५
- **पुण्यश्लोक श्री. सुरेश खानापूरकर - अविश्रांत ७५**
  डॉ. दत्ता देशकर / २२८
- **श्री.खानापूरकर यांना मिळालेले विविध पुरस्कार**/२९
- **अवकाशप्राप्त चिरतरुण** - श्री. हरीश बुटले / ३२

जलसंवाद हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. दत्ता देशकर यांनी ऐ - २०१, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंटस, पॅनकार्ड क्लब जवळ, बाणेर हिल्स, पुणे - ४११०४५ येथे प्रसिध्द केले.
संपादक डॉ. दत्ता देशकर
e-mail - dgdwater@gmail.com
मासिकाची वेबसाईट - www.jalsamvad.com

Jalsamvad monthly is owned & Published by Datta Ganesh Deshkar, & Published at A/201, Mirabel Apartments, Near Pan Card Club, Baner, Pune - 411045.
Editor - Datta Ganesh Deshkar

# संपादकीय ..........

## एका योग्याची जलसाधना

बऱ्याच साधना आत्मानंदासाठी असतात. मठात एकांतात बसून, अरण्यात एखाद्या वृक्षाखाली बसून तपस्या करणारे साधू पुरुष आपण बघतोच. त्यात जो आनंद मिळतो तो फक्त स्वतःसाठी असतो. पण काही साधना करणारे ती साधना दुसऱ्याचे कामी येईल अशा उद्देशाने करतात. कुष्टरोग्यांसाठी आपले स्वतःचे आयुष्य वेचणारे बाबा आमटे, स्वच्छता गृहांची मोठ्या प्रमाणावर उभारणी करणारे श्री. बिंदेश्वर पाठक, वृक्ष वाचवा मोहिम यशस्वी करणारे चिपको आंदोलनाचे जनक श्री. सुंदरलाल बहुगुणा, सहकाराचे आद्य जनक डॉ. धनंजय गाडगीळ, दूध उत्पादक महिलांची संघटना उभारणारे श्री. वर्गीज यांची आपापल्या कामातील साधना त्यांचे स्वतःसाठी थोडीच होती? जनसामान्यांना त्याचा लाभ मिळावा म्हणून यांनी स्वतःचे आयुष्य वेचले.

जलक्षेत्रात कार्य करणारी तशीच एक व्यक्ती म्हणून ज्यांचा आज आपण गौरव करत आहोत ते आहेत श्री. सुरेश खानापूरकर. या महिन्यात ते आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहेत. त्यांचे बाबत नितांत आदर व्यक्त करण्यासाठी आणि त्यांना या प्रसंगी शुभेच्छा देण्यासाठी जलसंवाद मासिक आज सेप्टेंबर २०२१ चा अंक श्री. खानापूरकर गौरव विशेषांक प्रकाशित करीत आहे. स्वतःचा भूजलविज्ञानाचा अभ्यास, सरकारी नोकरीत मिळालेला समृद्ध अनुभव, शिरपूरचे राजकारणी श्री. अमरिशभाई पटेल या तिघांचा संगम झाल्यामुळे आज देशात शिरपूर पॅटर्न नावाचे पॅटर्न जन्माला आले आहे ती त्यांची या जगाला एक अनमोल भेट आहे असे आम्ही समजतो.

आपण एखाद्या सेवेतून निवृत्त झालो म्हणजे आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता झाली असा सर्वसाधारण समज असतो. पण काही जणांचे खरे आयुष्य तिथूनच सुरु झाले असते. बायको. मुलांसमवेत उर्वरित आयुष्य जगणे आणि नातवंड्याना खेळवणे यातच अशी माणसे रममाण झालेली आपण पाहतो. खानापूरकर सरकारी नोकरीतून ज्या दिवशी निवृत्त झाले तेव्हा मी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी त्यांचे घरी गेलो असतांना ते मला म्हणाले, देशकर, मी निवृत्त झालो नाही, मी अवकाश प्राप्त झालो आहो. मला आता मिळणारा वेळ मी सत्कारणी लावणार आहे. सरकारी नोकरीत माझे ज्ञान वापरण्याची संधीच मला मिळाली नाही. ती आता मला अमरिशभाईंमुळे मिळत आहे हे मी माझे भाग्य समजतो. हिऱ्याला कोंदणाची गरज असते. ते कोंदण श्री. अमरिशभाईंनी त्यांना मिळवून दिले. या संधीचा लाभ घेवून शिरपूरला त्यांनी जगाच्या नकाशावर स्थान मिळवून दिले. आज शिरपूर हे एक तीर्थस्थान झाले असून तिथे जलवारकऱ्यांची ये जा मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. निव्वळ महाराष्ट्रातूनच नाही तर शेजारपाजारी राज्यांमधूनही जल अभ्यासक शिरपूरला येतात, योजना पाहतात, समजून घेतात आणि आपल्याही गावात असे कार्य व्हावे ही मनीषा बाळगून परत जातात. महाराष्ट्रात किमान २१ जिल्हे शिरपूरचे अनुकरण करतात. योजना यशस्वी झाली हे तेव्हाच समजले पाहिजे की जेव्हा तिची पुनरावृत्ती केली जाते.

श्री. पाशा पटेल यांचा एक लेख सदर मासिकात आहे. त्यांनी हे काम पाहिल्यावर कित्येक कार्यकर्त्यांना शिरपूरला पाठविले आणि त्याच्या धर्तीवर ही योजना गावोगाव कशी राबवली जात आहे याचे सविस्तर वर्णन त्यांनी या लेखात केलेले आढळते. अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी येथे एक जलपूजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाला मी स्वतः खानापूरकरांबरोबर उपस्थित होतो. या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या गावकऱ्यांच्या चेहेऱ्यावरील आनंद पाहून मन भारावून गेले. ज्या नाल्यावर बांधकाम झाले होते तिथे तर पाणी मुबलक होतेच पण आजूबाजूच्या किमान २०० विहीरी पाण्याने तुडूंब भरलेल्या मी स्वतः पाहिल्या. कार्यक्रमात शेजारील गावाचे काही नागरीक दीड लाख रुपयांची थैली घेवून आले होते. हे पैसे घेवून आमच्याही गावात असेच काम करा आणि आम्हाला जलसमृद्ध बनवा असा त्यांचा आग्रह होता.

काही कौटूंबिक अडचणींमुळे त्यांनी शिरपूर जरी सोडले असले तरी आजही ते स्वस्थ बसले नाहीत. दरवेळी त्यांना फोन केला तर ते कोणत्यातरी वेगळ्याच गावातून बोलतात. तिथे ते ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी गेलेले असतात. दरवर्षी त्यांचा एक कार्यक्रम ठरलेला असतो. दर जून महिन्यात शिरपूर क्षेत्रात उभ्या असलेल्या कापसाच्या पिकाचे फोटो ते मला पाठवत असतात. महाराष्ट्रात कोठेही कापसाची लागवड झालेली नसतांना येथील कापूस दोन ते अडीच फूट वाढलेला दिसतो.

कोणीही मोठा माणूस म्हंटला की त्याचे टीकाकारही भरपूर असतात. ते कोणत्याही टीकेला उत्तर देण्याच्या फंदात पडत नाहीत. माझे काम हेच माझेवरील टीकेला उत्तर आहे असे ते म्हणतात.

असा हा अवलिया माणूस आज ७५ वर्षे पूर्ण करतो आहे याचा मनस्वी आनंद होत आहे. त्यांचे उर्वरित आयुष्य असेच जनसेवेत व्यतीत होण्यासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

**डॉ. दत्ता देशकर**
**संपादक**

# सुरेश खानापूरकर - एक चांदण्याने भारलेले झाड

**शरद द. मांडे**

**मो : ९८६०९८२८२५**



**१. पाणी प्रश्न व त्याची सोडवणूक :**

१९५५-५६ मध्ये आकाशवाणी पुणे केंद्रावरून प्रथम प्रसृत झालेले व नंतर ज्याचे हजारो कार्यक्रम महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर लोकप्रिय झाले त्या गीत रामायण चे यश कोणाचे ? महाकवी ग. दि. माडगूळकरांच्या काव्य प्रतिभेचे की त्यातील गीते फुलविणाऱ्या गायक सुधीर फडके ह्यांचे असा प्रश्न जेव्हां उभा रहातो, त्यावेळी त्याचे उत्तर - ह्या दोघांचे एकमेकांच्या सहकार्याचे व मराठी माणसाच्या भाग्याचे असेच द्यावे लागते. नेमकी तीच अवस्था महाराष्ट्रात प्रसिद्ध पावलेला व इतरत्रही अंमलात आणलेला 'शिरपूर पॅटर्न' नक्की कोणाचा? नदी, नाले, ओढ्यांवर एकट्या शिरपूर तालुक्यात लोकांच्या सहभागातून २५० हून अधिक बंधारे बांधणाऱ्या सुरेश खानापूरकर ह्यांचा की त्यांना सर्व आर्थिक सहकार्य, राजकीय व प्रशासकीय पाठींबा, यंत्रसामुग्री, खंबीर साथ देणाऱ्या माजी शिक्षणमंत्री मा. श्री. अमरिशभाई पटेल ह्यांचा? ह्या प्रश्नाचे उत्तरही वरील गीतरामायणाच्या उदाहरणासारखे ह्या दोन महान व्यक्तिमत्वांच्या एकत्रित पराकाष्ठेच्या प्रयत्नांचा व शिरपूर तालुकावासियांचा असेच द्यावे लागेल. २० व्या शतकाच्या उत्तरार्धापासून जगभर पाण्याची समस्या तीव्रतेने भेडसावू लागली आहे. वाढती लोकसंख्या, त्यासाठी लागणारे जादा अन्नधान्य, औद्योगिक विस्तार, नागरीकरण ह्यामुळे एकीकडे दिवसेंदिवस पाण्याची मागणी वाढत चालली आहे आणि त्याबरोबरच पर्यावरणाचे बदलते संतुलन, पाणी वापराच्या वाढलेल्या सवयी, खालावत जाणारी भूजल पातळी, प्रदूषण इ. मुळे आकुंचित होत चाललेले उपलब्ध पाण्याचे स्त्रोत ! त्यामुळे देशात, महाराष्ट्रात तीव्र पाणी टंचाई भासत असतांना गेल्या दहा वर्षांत शिरपूर तालुका मात्र नुसता टँकर मुक्तच झाला असे नव्हे तर कायमचा जलसमृद्ध बनविण्याला गेला त्याचे सर्व श्रेय जनतेच्या सहभागाचा योग्य तो उपयोग करून घेणाऱ्या ह्या दोघांच्या एकात्मिक कार्यकुशलतेला द्यावे लागते.

१९४७ साली स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी ३०-३५ कोटी लोकसंख्या असलेला भारत आज १३५ कोटीवर पोहोचला आहे. ह्या गतीने २०५० मध्ये भारताची लोकसंख्या साधारणपणे १७० कोटीचे आसपास स्थिर होईल असा अंदाज असून त्यावेळी पाण्याची वार्षिक गरज सुमारे १४५० घन कि. मी. एवढी भासेल, उपलब्धता मात्र ११२०-११५० घन कि. मी. इतकीच असेल. ह्याचाच अर्थ देशाला त्यावेळेपर्यंत ३०० घन कि. मी. पाण्याची तूट भरून काढावी लागेल. ही बाब अशक्य नाही पण अवघड आहे, त्यासाठी जाणीवपूर्वक कसोशीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सिंचन व्यवस्थेत जलसंधारण व पिकनियोजन करणे, पिण्याच्या पाण्याचे क्षेत्रात असलेले गळतीचे प्रमाण ४०-५० टक्क्यावरून १०-१५ टक्क्यापर्यंत खाली आणणे, सांडपाण्याचा पुनर्वापर करणे व मुख्यत: पाण्याचे व्यवस्थापन पद्धतीत आमुलाग्र बदल करणे क्रमप्राप्त आहे. कोणत्याही समाजाची वा राष्ट्राची जलस्वयंपूर्णता त्यांचेकडे पाणी किती आहे, ह्यापेक्षा त्यांचेकडील पाण्याचे नियोजन किती व्यवस्थित आहे ह्यावर अवलंबून असते. भारताची सद्य: स्थिती लक्षात घेता फार मोठ्या बदलांची (Structural Reforms) आवश्यकता आहे. त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती (Political Will), प्रशासकीय कुशलता (Administrative Skill), सामाजिक सहभाग (People's Participation) ह्यातून उद्दीष्टपूर्ती होऊ शकेल. ह्या तीनही मूलभूत बाबींची देशपातळीवर उचित सांगड घालून राज्याच्या स्तरावर आखणी, जिल्हा व तालुका निहाय प्रयत्नपूर्वक अंमलबजापणी करावी लागेल. भारत हे जगाचे लघुचित्र तर महाराष्ट्र हे भारताचे लघुचित्र ! महाबळेश्वर, गगनबावडासारखे २००-२५० इंच पर्जन्यमानाचे प्रदेशापासून पाथर्डी, माणदेश, मराठवाडासारखा १५-२० इंच पडणाऱ्या पावसाचा, सह्याद्रीने व्यापलेला ७००-७५० कि. मी. सागर किनारा, सर्व प्रकारचे हवामान, खनिजे, धान्य उत्पादने व औद्योगिकीकरणात तर क्र. १ एवढे असूनही मात्र उन्हाळ्यात पाणी प्रश्न गंभीर स्वरूप धारण करतो. अशा वेळी शासनाचे सहकार्याने कितीही योजना आखल्या, राबविल्या तरी ज्या जनतेसाठी हे प्रकल्प राबविले जातात त्यांचेपर्यंत त्याची फळे पोहोचतातच असे नाही. त्याला शासकीय यंत्रणातील त्रुटी, नियम, कायदे कानून, आर्थिक सहाय्य व मुख्यत: कालापव्यय अथवा दिरंगाई इ. कारणे आहेत पण त्यावर मात करणे अत्यंत गरजेचे आहे. १०-१५ वर्षांपूर्वी शिरपूर तालुकाही अशाच प्रकारच्या दुष्काळाने होरपळणारा, पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेला होता हे आज कोणाला सांगूनही खरे वाटणार नाही. पण ते चित्र गेल्या १० वर्षांत पार बदलून दाखविले आहे ! खुद्द तालुक्याचे ठिकाण शिरपूर येथे नागरिकांना आज २४ x ७ पद्धतीने पेयजल मिळत आहे, तालुक्यात इतरत्र सर्वत्र पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तर सुटलाच आहे पण साठवण बंधाऱ्यांनी भूजल पातळी वाढल्याने विहिरींवरची बागायती फुलत आहे, विस्तारत आहे. हे सर्व मा. अमरिशभाईंचे दूरदृष्टी नियोजन व त्यासाठी श्री. सुरेश खानापूरकर ह्यांचे पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना सतत साथ दिली ! त्यामुळेच देशभर आज हा 'शिरपूर पॅटर्न' म्हणूनच नुसता नव्हे, तर 'खानापूरकर पॅटर्न' म्हणून ओळखला जात आहे.

**२. शिरपूर पॅटर्न - स्वरूप, व्याप्ति व मर्यादा :**

१९७२ च्या दुष्काळात तत्कालिन मुख्यमंत्री मा. वसंतदादा

पाटील ह्यांनी पाणी अडवा, पाणी जिरवा घोषणा करून जनतेला पाण्याचा प्रश्न हरप्रकारे सोडविण्यासाठी प्रवृत्त केले. नंतर आलेल्या शेतीनिष्ठ मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक ह्यांचे काळातही जलसंधारणाची, शेततळी, कंटूरबंडिंग इ. अनेक कामे व पागे योजना म्हणजेच देशभर सध्या वापरात असलेली रोजगार हमी योजना (म. न. रे. गा.) संकल्पना यशस्वीपणे राबविली गेली – कोयना, जायकवाडी, वैतरणा, उजनी, मुळा असे मोठे धरण प्रकल्प, मध्यम व लघुबंधारे ह्यांची कामे, विहीरी तसेच विंधण विहीरींचा धडक कार्यक्रम हाती घेतला. त्यामुळे राज्याचा विद्युत प्रश्न सुटण्यास भरीव मदत झाली. तसेच उद्योगधंदे विस्तारले नागरीकरण झाले. सिंचनाचे क्षेत्र वाढून हरितक्रांती झाली पण ह्याच काळात लोकसंख्या ही जास्त वेगाने वाढली व विकासाचा मोठा वाटा त्यासाठी वापरला जाऊ लागला. वाढत्या क्षेत्रासाठी पाणी प्रश्न गंभीर बनू लागला. कॅचमेंट एरिया ट्रिटमेंट, कट ऑफ ट्रेंच, जलसंधारणाची कामे, पाझर तलाव, विहीरी, कूपनलिका इ. मुळे स्थानिक स्तरावर प्रश्न सुटण्यास मदत झाली पण सर्व कार्यक्रम शासकीय पद्धतीने हाताळला जात होते व त्यासाठी जलसंपदा विभाग, जिल्हा परिषदा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ इ. शासकीय विभाग कार्यरत असले तरी आर्थिक निधीची कमतरता, यंत्रणेतील ढिलाई, नियमांची बंधने, जनतेच्या सहभागाचा अभाव व मुख्यत: हे सर्व उपक्रम ज्यांचेसाठी राबविले जात होते त्या लाभार्थी जनतेने हा प्रकल्प माझा आहे, आपला आहे असे न वाटता हे सरकारी काम आहे ह्या स्वातंत्र्यापूर्वीच्या ब्रिटीशांच्या अंमलाखालील मानसिकतेतून पाहिले. शिरपूर पॅटर्न चे यश हे मुख्यत: सुरेश खानापूरकरांचा सरकारी सेवेमधून मिळालेल्या भूजल व्यवस्थापन शास्त्रातील अनुभव त्याच बरोबर शासकीय कार्यक्रमाचे अंमलबजावणीतून जाणवलेल्या व वर उल्लेख केलेल्या विविध त्रूटींवर मात करून केलेल्या प्रयत्नांत व त्याचवेळी त्यांना ह्या धडाकेबाज कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याच्या मा. श्री. अमरिशभाई पटेल ह्यांच्या खंबीर नेतृत्वाचे आहे. अनेक राजकीय व सामाजिक नेते कार्यसम्राट असतात, त्यांना दूरदृष्टी व जनतेच्या हिताची कामे करण्याची जिद्द, ईर्षा व ताकद असते पण व्यवस्थितपणे व वेळोवेळी संबंधीत गावकरी, नागरिक ह्यांना प्रेरणा देणे व हे आपले काम आहे ही जाणीव निर्माण करून देण्याचे धोरण हे जमत नाही, येथे हे कर्तृत्व व नेतृत्व मा. अमरिशभाई ह्यांचे !

खानदेशातील शिरपूर तालुका हा बराचसा दुष्काळ वा जलटंचाईचा तालुका म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्राचा साधारणत: ८० टक्के भाग हा सह्याद्री व विंध्य म्हणजेच पठाराचा सुमारे ६५ दशलक्ष वर्षांपूर्वी लाव्हा रसाच्या उद्रेकातून थंड झालेल्या ज्वालामुखीच्या बेसाल्ट खडकाने व्यापलेला आहे. ह्या खडकात गाळाच्या खडकासारखी सच्छिद्रता व जलधारण क्षमता नसते. साधारण वरचा ६–८ मीटर थर सच्छिद्र व त्यांत कांही प्रमाणात असतो. तापी व पूर्णा ह्या नद्यांचे सभोवतालचा भाग अकोला, अमरावती, धुळे, बुलढाणा, नंदूरबार साधारणत: १०० ते ३०० मीटरपर्यंत काळी माती, पिवळी माती, गोटे, चुनखडी, बारीक जाड रेती ह्यांचे थराने बनलेली आहे. पूर्वेकडील भाग नागपूर, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली हा रूपांतरित खडकाचा आहे, त्यामुळे ह्या प्रदेशात जमिनीत पाणी धारण करण्याची क्षमता जास्त आहे. भूजल संवर्धन, संचय व संकलन चांगले होऊ शकते.

त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रांत धरणे जास्त झाली, मराठवाडा, विदर्भ, खानदेशांत जलसंधारणाची कामे खूप ! शासनाने जरी बरीचशी गुंतवणूक केली असली तरी असे आढळून आले की त्यातील कित्येक पाझर तलाव लवकरच गाळाने भरले, शेततळी आटली, बांध फुटले वा वाहून गेले. नद्या शुष्क झाल्या, विहीरी कोरड्या पडल्या, बोअरवेल दरवर्षी १००–२०० फूटाने खोलवर जाऊ लागल्या अन् मग ह्या सर्वांचे खापर शासनावर फोडले जात आहे. ह्या यंत्रणेतून अनेक तज्ज्ञ, अभियंता ह्यांनी उत्कृष्ट योगदान दिले पण वर नमूद केल्याप्रमाणे कित्येक वेळा राजकीय बळकावणी, दबाव, ह्यामुळे कामांचा खालावलेला दर्जा, बंधाऱ्यांच्या चुकीच्या जागा, कालापव्यय व भ्रष्टाचार इ. मुळे अपेक्षित उद्दीष्टे साध्य होऊ शकली नाहीत. श्री. खानापूरकर ह्यांनी त्यांच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतील निष्ठेने व नेकीने नोकरी करतांना उघड्या डोळ्यांनी जे ग्रहण केले त्यातून रक्तातल्या संघस्वयंसेवकाला निवृत्तीनंतर दुसऱ्या दिवसापासून ह्या देशकार्याला जुंपून घेतले. ३०–४० वर्षांच्या अनुभवामधून शिरपूर तालुक्याचे पर्जन्यमान, पावसाचे दिवस (२.५ मिमिपेक्षा जास्त पाऊस पडला तर



तो दिवस पावसाचा धरण्यात येतो) (Isohytes), भूजल क्षमता (GWT), ओढे, नद्या, नाले व जमिनीचा पोत (Topography of Strata) ह्यांचा अभ्यास तर तयार होताच, त्याला धरून वैज्ञानिक दृष्टीकोनातून सर्वसाधारण कामाची व्याप्ति, बंधाऱ्यांचे नियोजन, जनतेला प्रोत्साहित करणे ह्या सर्वांचा आराखडा (Road Map), मा. अमरिशभाईंशी तातडीने चर्चा करून पक्की आखणी केली. ड्रॉईंग / डिझाईन, सर्व्हे इ. साठी कालपव्यय न करता साईटवर कामाला धडाक्याने सुरूवात केली. सिमेंट, वाळू इ. साहित्य, मशिनरी मा. अंमरिशभाईंच्या सूतगिरणी वा इतर प्रकल्पातून, बांधकामनिर्मिती स्थानिक लाभधारक शेतकऱ्यांची व मार्गदर्शन खानापूरकरांचे ह्या त्रिवेणी संगमातून 'सेतू बांधारे - सेतू बांधारे सागरी' ह्या गीताप्रमाणे जोमाने, ईर्षेने पहिल्या २-३ वर्षात २५-३० बंधारे बांधले गेले, पावसाळ्यात पाणी साठले, सभोवतालचे शेतकरी बंधारा त्यांच्याच असल्याने पाण्याचे रक्षण करू लागले, पुरवून वापरू लागले व पिक नियोजन करून गहू, बाजरी, ज्वारी बरोबर (ऊस सोडून) टोमॅटो, भाजीपाला, फळे घेऊ लागले. तालुकाभर ह्या यशाची सर्वत्र मागणी, आखणी व उभारणी झाली. गेल्या १५ वर्षात सिमेंट बंधारे ५, नालाखोलीकरण रूंदीकरण - ५२ कि. मी. सिंचनाखाली वाढलेले क्षेत्र ११००० हेक्टर, साठवलेले पाणी ३२ कोटी घनमीटर, भूजलाची वाढलेली पातळी बेसाल्टमध्ये ३०० फूट खाली गेली होती ती आज जमिनीखाली ३० फूटापर्यंत वर आली व तापीच्या गाळाच्या प्रदेशात ५०० फूट खाली गेली होती ती वरवर चढत जमिनीखाली ६० फूटापर्यंत आली आहे. साधारणत: ७० गावातील २५० बंधाऱ्यासाठी फक्त ६० कोटी खर्च नव्हे 'आर्थिक गुंतवणूक' व दुष्काळी प्रदेशांत उत्पादनात समृद्धि !

पण हे अवधान बाळगले पाहिजे की यश आले की डोळे झाकून त्याची झेरॉक्स प्रत म्हणून काढू नये. दुसरा महाराष्ट्र जल व सिंचन आयोग (१९९९ - चितळे आयोग) ह्यांनी नमूद केल्याप्रमाणे आपल्या महाराष्ट्रात साधारणत: सध्या १८ ते २० टक्के लागवडीखालील सिंचन क्षेत्र आहे. ते अतिप्रयत्नाने ३५ टक्केपर्यंत वाढू शकेल. त्यामुळे शिरपूर पॅटर्न जेथे १५-२५ पर्यंत पर्जन्यमान आहे, जमीनीचा पृष्ठभाग फार ऊंच खोलगटदरीसारखा नाही, ओढे, नाले मधून महावृष्टीने पडणाऱ्या मान्सूनचे पाणी लगोलग ढाळाने वाहून जाते व नदीला मिळते तेथेच ते अडविले जाईल. जमीन चिकट, काळी / तांबडी, मुरूमाड अशी जलधारक आहे व दोन्ही काठ बंधारा गुंतवता येईल अशा ठिकाणी उतारा उताराने बंधाऱ्याची मालिका करणे योग्य ठरेल. उगीचच उघड्या बोडक्या माळरानाच्या खडकावर खानापूरकरांचे नांव घेऊन छिन्नी हातोडा मारण्याचे धाडशी प्रयोग करू नयेत.

**३. यश लोकसहभागाच्या चळवळीचे :**

वरील परिच्छेदात जलसंधारणाचे कामाची पेरणी, उभारणी, यशस्वीता पण त्याच्या मर्यादा ह्यांचा उल्लेख केला आहे. त्याचबरोबर गेल्या १५ वर्षांत झालेल्या कामाची व्याप्ति मोजमापांत व्यक्त केली आहे. हे सर्व जलसंचय, त्यासाठीची गुंतवणूक, त्याचे दृष्यफल ह्याची आकडेवारी झाली. हे बाह्यस्वरूपाचे मोजमाप आहे. इंग्रजांनी १०००० किमी वरून भारतासारख्या प्रचंड देशावर १५० वर्षे राज्य करतांना त्यांचे प्रशासनाचे दृष्टीने सोईस्कर अशी अकांऊटिंग व्यवस्था, दळणवळण, वाहतुक, रेल्वे, जलव्यवस्थापन आखली, राबविली. ते करतांना त्यांना राज्य करणेचे दृष्टीने सोईस्कररित्या राबवणूक केली. जलव्यवस्थापन हा विषय त्याच पद्धतीने हाताळला. दुर्दैवाची बाब म्हणजे गेल्या ७० वर्षांत स्वातंत्र्य मिळूनही अजून आपण त्यांच्याच सिस्टीमप्रमाणे यंत्रणा राबवत आहोत. पाणी हा विषय भारतात राज्यांकडे सोपविला आहे, त्यामुळे आंतरराज्य तंटे, निवाडे, लवाद ह्यात वर्षानुवर्षे राज्या-राज्यात झगडे चालू आहे. पाटबंधारे मंत्री, मंत्रालयात सचिव, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व तहशीलदार अशी जलसंपदा खात्याची उतरंड ! वास्तविक खोरे निहाय यंत्रणा स्थापन करणे व व्यवस्थापन करणे आवश्यक आहे, म्हणजे समग्र खोरे हा एक भाग धरून विकासासाठी पाण्याचे एकात्मिक नियोजन होऊ शकेल. महाराष्ट्रात कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा व पश्चिम वाहिन्या अशी ५ खोरी आहेत. त्या अनुषंगाने यंत्रणा राबविली पाहिजे. 'शिरपूर पॅटर्न' किंवा असे पोपटराव पवार, मानवलोकचे श्री. द्वारकाप्रसाद लोहिया, लूपिन इंडस्ट्रीज, पाणी पंचायत, हिवरे बाझार ह्यांनी जे तंत्रज्ञान वापरलेले ते पूर्वी उपलब्ध होतेच, त्याचा काही नवा शोध लावला नाही, पण आहे त्या तंत्रज्ञानाची त्यांनी नव्याने मांडणी केली, हे वैशिष्ट्य आहे. जनतेत विश्वास निर्माण केला, योजना त्यांच्या मालकीच्या व फायद्याच्या आहेत हे पटवून दिले, समाज अशा नेतृत्वाला दाद देतो ह्या न्यायाने लोकसहभाग निर्माण झाला व हां हां म्हणता कामे उभी राहिली. अनेक कामे मी. स्वत: मा. खानापूरकर साहेबांबरोबर पाहिली. प्रत्येक ठिकाणी लोकांना बरोबर घेऊन ओढ्याच्या पाण्याची उपलब्धता, जमिनीचा पोत, प्रवाहाचे वळण इ. विचारात घेऊन बंधाऱ्याची जागा निश्चित करणे, नंतर आवश्यक तेवढा खोल पाया जनतेच्या सहभागाने खणणे, मशिनरी व कॉंक्रिट, साहित्य वेळेवर पुरवून व नाल्याचे खोलीकरण, रूंदीकरण एकीकडे करणे व त्याचवेळी बंधाऱ्याचे बांधकाम. येणाऱ्या पावसात पाणी साठले की परिसरातील विहीरींना पाणी लागले आणि कांही ठिकाणी उपसा सिंचनाने शेती बहरली. जनतेने हे १-२ सिझनमध्ये न्याहाळले आणि बोलता बोलता सहभागाचा कारवॉं निर्माण झाला. सर्वसाधारणपणे वर म्हटल्याप्रमाणे बंधाऱ्याची लांबी, रूंदी, खोली / ऊंची, साठलेले पाणी व पिकलेली शेती ही व्यावहारिक फिजिकल वा हैड्रॉलॉजीकल मांडणी झाली, ती मोजमापे आहेत, पण त्या पाठीमागे लोकांना प्रवृत्त करणे, त्यांना एकत्रित आणणे, कामाला जोडणे व त्यांचा बंधारा निर्माण करणे हे सर्वात महत्वाचे आहे, ह्यावर सहसा कोणी बोलत नाही. ही जनतेची चळवळ म्हणून निर्मिती झाली हा खरा 'शिरपूर पॅटर्न'.

**४. सुरेश भालचंद्र खानापूरकर - हे तो चांदण्याने भारलेले झाड :**

अमरावतीत जन्मलेले खानापूरकर येत्या २६ सप्टेंबरला ७५ वर्षे पूरी करत आहेत. धामणगांव, काटोळ येथून प्राथमिक शिक्षण घेतल्यावर भद्रावतीला मॅट्रीकपर्यंत १ ल्या , दुसऱ्या क्रमांकाने माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. नागपूरला बी.एस.सी. झाल्यावर १९७१ मध्ये एम.एस.सी. टेक. पदवी चांगल्या रितीने प्राप्त केली. भूगर्भ शास्त्राची प्रथम पासूनची आवड व त्यातली उच्च उपाधी ह्यामुळे लगेचच महाराष्ट्र शासनात भूवैज्ञानिक सहाय्यक म्हणून दाखल झाल्यानंतर

१९७४ मध्ये सहाय्यक भूवैज्ञानिक, १९८९ मध्ये वरीष्ठ भूवैज्ञानिक वर्ग (१) झाल्यानंतर अनेक ठिकाणी निष्ठेने, जीव झोकून काम करत सप्टेंबर २००४ मध्ये ३३ वर्षांच्या शासकीय बांधीव, आखीव सेवेतून निवृत्त झाले आणि दुसऱ्या दिवसापासून लगेच मा. अमरिशभाईंच्या साथीने समाजाच्या नितांत गरजेच्या दर दिवस नवी आव्हाने, दर दिवशी नवी माणसे, दर दिवशी नवे यश ह्या धावपळीला जुंपून घेतले. शिरपूर तालुका जलसमृद्ध करणेसाठी जीवापाड प्रयत्न केले. ह्या प्रत्येक ठिकाणी जनतेचे प्रेम, त्यांचेबद्दलचा त्यांनी आदर, अर्पिलेले देवत्वपण जपत व घरोघरची माणुसकी मिळवत गेले. ह्यामुळे हा त्यांचा अमरिशभाई समवेत झालेला पाण्याशी संबंधाचा संसार, ज्या पद्धतीने सकाळी घरातून बाहेर पडल्यावर दिवसभर अमरिशभाई ह्यांचेशी गांठ, त्याच पद्धतीने दिवसाच्या काबाड कष्टानंतर रात्री उशिरा घरी आले की मग व्यावहारिक दृष्टीने सौ. माधुरी ताईंशी पत्नी ह्या नात्यांचा संसार. उद्यां कोठे जायचे, किती वाजता निघायचे, कोण कोण येणार आहे, त्यांची घरी रहायची व्यवस्था काय, जेवणाचे काय ही सर्वच जबाबदारी, आनंदाने आपुलकीने पार पाडणाऱ्या आदर्श गृहिणी सौ. माधुरीताई ह्यांचेवर ! एकश्चंद्रो तमो हन्ति, नच शत तारांगणे म्हणतात त्याप्रमाणे आयुष्याच्या सर्व चढ उताराला श्री. सुरेशरावातील संघ स्वयंसेवकाला संभाळून राष्ट्रीय समाज धारणेच्या कामाला जुंपणाऱ्या सौ. माधुरी ताईंचे योगदान ही 'शिरपूर पॅटर्न' नावाजला जाण्यामागची अदृश्य सावली ! गेल्या दहा पंधरा वर्षांत शिरपूरला शेकडो कार्यकर्त्यांनी, समाजसेवकांनी, सरकारी अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या आहेत. ह्या सर्वांना खानापूरकरांचा घरगुती पाहुणचार मिळाला आहे. मी सुद्धा अनुभवला आहे. हसतमुखाने आल्या गेल्यांचे स्वागत सौ. माधुरीताईंनी ज्या पद्धतीने केले आहे वा त्यासाठी पडलेली तोशीस आनंदाने पेलली आहे. खरे तर त्यासाठी झालेल्या खर्चातून अजून ५-१० बंधारे तरी खानापूरकर ह्यांनी बांधले असते, असे उगाचच वाटते.

खानापूरकरांनी संघशिक्षा वर्ग ३ पूर्ण केले आहेत हे महाराष्ट्राच्या मंत्री मंडळातील काँग्रेसचे अमरिशभाई, मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण ह्यांच्यासारख्यांना पूर्णपणे माहिती आहे. त्यामुळे एखादा समाजवादी सेवादलाचा कार्यकर्ता असो कम्युनिस्ट भाई असो की सरसंघचालक मा. मोहनराव भागवत असो वा २४ जुलैला महाराष्ट्राच्या दोन्ही विधानसभा, विधानपरिषद एकत्रित सदस्यांपूढे केलेले प्रदीर्घ सादरीकरण असो की 'जलयुक्त शिवार' ही संकल्पना माजी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस ह्यांना देणारे अथवा माळरानावरच्या खेड्यातल्या बांधकामावरील शेतकरी असो सारख्याच तळमळीने मदत करणारे कायम माणसांच्या गराडयात राहिलेले, भाऊ, बहिण, मित्र परिवार राखावी बहुतांची अंतरे नात्याने जोडणारे सुरेशकाका खानापूरकर हे तो माणुसकीच्या चांदण्याने भारलेले झाड !

*****

## सोनियाचा दिनु....

आज दिस असे सुखाचा ।
स्वजन - सृजन कौतुक करिती ।
वर्षाव शुभेच्छांचा तुम्हास अर्पिती ।।१।।

सोहळा आज कर्तृत्वाचा ।
आजच्या या भगीरथाचा।
गंगातरण काय ? हेच ते।
कोण म्हणतय नाही ते ।।२।।

जल स्त्रोतास अडवून धरिले।
तिचेच पाणी तिज अर्पियले।
सुजलाम - सुफलाम धरतीस केले।
सुरेश नावाने कोण वाया गेले।।३।।

माता तुमची धन्य जाहली ।
पुत्र कौतुक बघत राहीली।
संयोग किती हा सुंदर हो।

सहस्त्र चंद्र बघून झाले हो।।४।।
आयुष्याच्या या प्रवासात।
भार्ये ची असता साथ।
कधीच सोडली नाही निती।
म्हणून कशाची नाही भिती ।।५।।

माझी तनया तुमची स्नुषा।
होती मनीची एक मनीषा।
मित्राचे व्याही झाले।
नाते घट्ट विणल्या गेले ।।६।।

अभी तो मैं जवान हूं।
काम के लिये तयार हूं।
हंसी - मजाक चलती है।
पर कामपे निष्ठा रहती है।।७।।

कार्यासाठी मुहूर्त नको।
सत्कार्यासाठी बळ नको।
फक्त हवी ती इच्छाशक्ती।
हीच खरी ती ईश्वरभक्ती ।।८।।

....मुकुंद आमटे

# शिरपूर पॅटर्न चे जनक श्री. सुरेश खानापूरकर

**श्री. पाशा पटेल**

**मो : ९३७००५५७८६**



सुरेश खानापूरकर यांचा अमृत मोहत्सवी वर्ष या वर्षी साजरा करण्याचा आपण निर्णय केलेला आहे. त्याबद्दल मी आपणाला लाख लाख शुभेच्छा देतो. समाजामध्ये माणसं खूप आहेत, वेगवेळ्या विषयावर काम करणारे. काही लोक सल्ला द्यायचं काम करतात, काही लोक काम करतात , काही लोकांच्या कामामुळे समाजाचे भलं होत असतय. अशी अनेक माणसं आहेत परंतु प्रत्यक्ष त्या माणसाच्या कामाची पध्दत बघितल्या नंतर त्या माणसाचं मोठे पण लक्षात येतं. मी लातूर जिल्ह्यातला, मी लहान असताना आमच्या नाल्यामध्ये हाताने वाळू सरकवायचो, आणि जनावरं जसं पाणी पितात तसं मी माझ्या शेतात पाणी पिलेलं आहे. आणि आज त्याच शेतामध्ये जर मला पाणी प्यायचं असेल तर ७०० फूट बोअर घ्यावं लागले. तरी पाणी लागेल की नाही याची गॅरंटी नाही. अशी अवस्था ही फक्त माझ्याच जिल्ह्यातच आहे की जगभर सुरू झालेली आहे हा विषय वेगळा आहे. परंतु मला प्रकर्षाने जाणवलं की आपल्या जिल्ह्यामध्ये भयानक काहीतरी पाण्याचा प्रॉबलेम निर्माण झाला आहे. मग काय करता येईल, तर त्या संदर्भामध्ये खूप विचार केलो आणि मग आपण असं ठरवलं की या संदर्भामध्ये कुठं कुठं कामं चालू आहेत आपण बघायला पाहिजे. आणि मग पोपटराव पवार, अण्णा हजारे साहेब आहेत, राजेंद्र सिंग राणा साहेब आहेत, ही सगळी वेगवेगळी मंडळी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये काम करतीय, पाण्याशी संबंधीत.

पोपट पवार म्हणतात की डोंगरावर चर खंदा , कुंटूर, झाडं लावा, कुऱ्हाड बंदी करा, बोअर बंदी करा म्हणजे मग आपल्या गावातल्या पाण्याची पातळी वाढेल.

राजेंद्रसिंग राणा म्हणले की, सात हरवलेल्या नद्या आम्ही शोधून काढल्या, वहात्या केल्या.

अण्णा हजारे जलसंधारणाचं त्यांच्याकडे राळेगणसिध्दी नावाचे गाव आहे हे सगळ्या गोष्टी बघितल्यानंतर हे आयुर्वेदीक उपचार आहेत सगळे म्हणजे ते कोणालाही लोकांना इंटरेस्ट फास्ट फूड चा जमाना आला आहे, मला अर्जंट पाहिजे ते, मग हे सगळ बघून त्याच्यानंतर मी आमदार झालो. आमदार झाल्यानंतर भूजल विधेयकावर राज्य शासनाने एक समिती स्थापन केली आणि त्या समिती मध्ये मला पण घेतल आणि लक्षण धवळे त्या समितीचे पाणी पुरवठा मंत्री असल्यामुळे त्या समितीचे अध्यक्ष होते. मी त्या समितीमध्ये २ वर्षे प्रामाणिकपणे विद्यार्थ्यासारखे काम केले. विद्यार्थ्यासारखे काम केल्यानंतर मग एक दिवस असे लक्षात आले की हे सगळे आपण बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात दिसतो यार सगळे हे. परंतु खरंच कुठे हे होतं हा. भूर्गभागीतल पाण्याची पातळी वाढते का हे कुठतरी बघितलं पाहिजे, मग कुठे – त्या वेळेस आम्हाला अलवर जिल्ह्यामध्ये राजेंद्रसिंग चं काम बघायची संधी आली जेव्हा मी १० – १५ आमदार घेवून मी गेलो, सगळं बघितलं, आणि मग पातळी वाढवता येती एवढं कळलं. त्याच्यानंतर मग हे सगळंच करत असतांना सुरूवात कुठून करायची, आत्ता मला पाणी हवे हो, मग आता सुरूवात कशी करायची. मग प्रसंग असा आला की, कुणीतरी सांगितलं की ते सुरेश खानापूरकर शिरपूर तालुक्यामध्ये धुळे जिल्ह्यामध्ये काम करतात आणि अमरिशभाई पटेल त्यांना सहकार्य करतात तर ते काम आपण बघून आलं पाहिजे आणि मग मी शिरपूरला गेलो, खानापूरकर साहेबांना भेटलो, त्यांची सगळी कामे निरखून बघितली आणि सगळं बघितल्यानंतर मला लक्षात आलं की हे तर चमत्कार आहे की याच्यामधे काही पण करता येते आणि सुरूवात करायला सोपं न. काय करता येवू शकतं आपणाला म्हणजे लोकाला पाणी पाजवायचं आहे . पाणी पाजवायचं म्हणजे मग आता सर्व माळावरचे चर खंदा, माळ नाहीतर मग काय करणार, म्हणजे असे वेगवेगळे प्रश्न. मग हे खानापूरकर साहेबांचं बघितल्यानंतर लग असे लक्षात आलं की सगळ्यात शॉर्टकट आहे. पाण्यामध्ये काय सगळ्यात शॉर्टकट आहे. तर हे शॉर्टकट. आणि मग मी ते बघून आल्यानंतर जवळपास २५ गावच्या लोकांना मी गाडी करून पाठवली. बसच केली एक , २५ गावची लोकं जाणार, जायला बस माझी, यायला बस माझी, लोक जायचे आणि बघायचे – म्हणायचे लय चमत्कार आहे, लय चमत्कार आहे राम, असलं केलं पाहिजे, असलं केलं पाहिजे असं सुरू झालं. आणि मग पंकजा मुंडे म्हणजे गोपीनाथ मुंडे यांचा परळी वैजनाथ येथे साखर कारखाना आहे. त्या साखर कारखान्याच्या परिसरामध्ये आम्ही असं ठरवलं की आपण याच्यावर काम करू आणि मग आम्ही मुंडे साहेबांना हे सगळं समजून सांगितले, मुंडे साहेबांनी आता मी काय म्हातारा होत आलोय म्हणले पंकजाला समजावून सांगा म्हंटले, मग पंकजा मुंडे यांना समजावून सांगितलं, आणि मग पंकजा मुंडे यांना समजावून सांगितल्यानंतर मग त्यांच्या पूर्ण जिल्ह्यातल्या लोकांचं एक दिवसाचं शिबीर घेतलं. पंकजा मुंडे गोपीनाथ मुंडेंची मुलगी परंतु दिवसभर विद्यार्थी बसल्यासारखं तिथे त्या बसल्या आणि सगळं पाणी समजून घेतलं आणि त्यावर काम सुरू केलं.

त्याच्यानंतर मग असं आम्ही एक गाव निवडलं बीड जिल्ह्यामध्ये मुंडे साहेबांच्या मतदार संघामध्ये. मी एके दिवशी सहज गावामध्ये गेलो होतो, दुपारची एक ची वेळ होती मार्च – एप्रिल चा



महिना होता. आणि गावामध्ये प्रत्येक घरात बुलेट, परंतु सगळ्या बुलेट वाल्यांच्या बायका लाईनेने टँकर ची वाट बघत प्लास्टिक च्या घागरी घेवून लाईनी लाईनी थांबलेल्या. एवढ्या चांगल्या घरच्या बाया आणि टँकर ची वाट बघू राहील्या. मग मी त्या लोकांना शिव्या दिल्या आणि म्हंटलो मुर्खांनो बुलेट वर फिरवताय, आणि बाई मात्र पाण्यासाठी उभ्या, शर्मा नाही वाटत का रे तुम्हाला, काय केलं पाहिजे, म्हंटलं आपण करूत काहीतरी, काय करूत, अरे मी म्हणलं सांगतो तुमच्या गावात पाण्याचं काम करून देतो. एकदा का आम्ही माननीय गोपीनाथ मुंडे साहेबांचा खासदार फंड १० लाख घेतला मी आणि ठोंबरे साहेब, नॅचरल शुगर चेअरमन आहेत त्यांच्याकडून १० लाख घेतले, १० लाख रूपये गावात तयार केलेत आणि मग एप्रिल मे जून पर्यंत आम्ही गावातला पूर्ण काम म्हणजे नाले सरळीकरण, खोलीकरण करून टाकलं. चमत्कार असा झाला की त्या गावामध्ये साडेपाचशे बोर होते , १ जून मधे पाऊस पडला आणि साडेपाचशे बोअर रिचार्ज झाले, चमत्कारच...... आणि योगायोगाने मग विधानसभेला थांबलो मी, विधानसभेच्या निवडणुकीला थांबल्यानंतर मी काय करत होतो, गावात जायचं सभा घ्यायची, आणि माझ्या खिशातले ५ हजार रूपये काढून ठेवत होतो तिथे त्या गावाला, एक जीप घ्या भाड्याची , ३ हजार जीप च्या भाड्याला, २ हजार जेवायला आणि हे गाव असे थोडे बघून या बंसारळा, केज तालुक्यातलं. आणि मग लोकं जायचे, ते गाव बघायचे आणि आपण काय त्यांना सगळं गाव फिरून या म्हणून सांगायचं, सगळे गावातले लोक माझ्यावर वा वा वा म्हणले असं झालं, असं झालं, तर मी निवडणुकीमध्ये लोकायला सांगितलं की मी जर निवडून आलो तर ते असलं पूर्ण तालुका करून देईन तुम्हाला. काय, आणि मग सगळ्या गावाची लोकं मला दारू मागायचे नाहीत, काही नाही काही नाही फक्त आम्हाला ते बंसारळा दाखवून आणा म्हणायचे. आणि मग ५ हजार रूपये रेटच काढून टाकला, ५ हजार रूपये घ्या आणि जावून ते गाव बघून या. सुरू झालं काम,आणि मग मी निवडणूक लढवीली, पडलो. पडलो म्हणजे काय झालं, ४० हजार लोकांनी मत दिले मला मग म्हंटलं की आता आपल्याला पाण्यात काम करायचं, आणि मग पूर्ण तालुका ते गाव बघून आलं होतं, आता म्हंटलं आपण प्रत्यक्ष खानापूरकरला घेवून जावू, आणि मग २ लाख रूपये देवून एक दिवस पैसे देवून पिक्चर बघायची जी गाडी असती एलईडी, ती मी बंगलोर वरून गाडी मागवली २ लाख रूपये एक दिवसासाठी देवून. आणि खानापूरकरांना बोलवलं, १२ जिल्हा सर्कलच्या गावात १२ सभा घेतल्या. एक तर ते खानापूरकर ते पिक्चर दाखवत होते, आणि ते बोलत होते, तर असं हे सगळं झाल्यानंतर पूर्ण मतदारसंघ येडा झाला आणि तुम्हाला सगळ्यात चमत्कार सांगतो की त्याच काळामध्ये राज्य सभेचे खासदार संजीव काकडे यांनी आम्हाला दोन – अडीच कोटी रूपये खासदार फंड दिला, आम्ही तेवढेच पैसे घातले आणि ते पैसे घेवून आम्ही गावा गावात गेलो की तुमच्या गावाला ५ लाख देतो, तुमच्या गावाला १० लाख देतो, तुमच्या गावाला २५ लाख देतो. नवीन नवीन जे गाव होतं पहिलं त्याला २५ लाख रूपये खासदार फंड देतो म्हटलं , बरं तेवढेच पैसे तुम्ही जमा करायला पाहिजे, आणि चमत्कार झाला.... जेवढा खासदार फंड आम्ही दिला तेवढेच गावातल्या लोकांनी जमा केले. मग हे २५ – २५, ५० झाले, मग आम्ही कलेक्टर कडे गेलो, कलेक्टर ला सांगितलं मुख्यमंत्री जे कलेक्टर पाण्यामध्ये चांगलं काम करणार आहे त्याला पुरस्कार देणार आहे. ते म्हणाले माझ्याकडे ५–६ कोट रूपये जमणार आहे, ते म्हणले मी काय करू , मी म्हणलंकी कार्यकर्त्याला हा पुरस्कारच नाही, हा पुरस्कार कोणाला आहे, हा पुरस्कार अधिकाऱ्याला आहे, म्हणजे तुम्हाला हा पुरस्कार मिळणार आहे, तर मी काय करू, मी म्हणलं एवढेच पैसे तुम्ही घाला न महात्मा जल भूमी अभियानामधे, ते म्हणे ठीक आहे. मग अशा पध्दतीने जिल्हाधिकारी, म्हणजे खासदार फंड आणि गाव वाले अशी सांगड घातली, आणि मग जवळपास १० –२० वेळेस सुरेश खानापूरकर आम्ही आमच्या तालुक्यात बोलावले, प्रत्येक कामावर त्यांना भेट करवून दिली आणि मग वॉटर बजेट काय असतं म्हणजे आभाळातून पाणी किती पडतय, किती जमिनीत मुरत, पाणी किती लागणार आहे, जनावरांना किती लागणार आहे, माणसांना किती लागणार आहे, याचं बजेट करता येतं. हे येवढ पहिल्यांदा कळलं की एक हेक्टर मध्ये अडीच कोटी लिटर वर्षाला पाणी पडतंय, एवढं पाणी जातंय कुठे, या सगळ्या गोष्टी आम्हाला भूजल तज्ज्ञ असल्यामुळे खानापूरकरांकडून आम्हाला सगळं

शिकायला मिळालं. आणि मग मी ३८ गावात हे काम केलं. आणि त्यावेळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काम बघायला आले, शरद पवार काम बघायला आले, आणि मग जवळपास म्हणजे तुम्हाला काय चमत्कार सांगू की ७-८ कर्नाटकातले आयएएस अधिकारी काम बघायला आले. आताचे निपाणीचे खासदार अण्णासाहेब जोलले आणि महिला आणि बालकल्याण मंत्री कर्नाटकचे आणि त्यांच्या मिसेस हे दोघं पतीपत्नी माझ्या गावाला आले. त्याच्यानंतर कर्नाटकाच्या विधानसभेचे माजी अध्यक्ष म्हणजे ५ वर्षे ज्यांनी विधानसभेचे अध्यक्षपद भूषविले असे डी.आर. पाटील ते आमच्या गावात आले, पाण्याचे काम बघितले, आणि मग ते एवढे प्रभावित झाले की आता त्यांनी जवळपास ५० कोटी रूपये त्यांच्या गुबर्गा जिल्ह्यामध्ये गुंतवले. आमचं काम बघून त्यांनी तिकडे सुरू केलं आणि आता खरं तर २१ तारखेला त्यांच सिध्दरामय्या कोणाच्या तरी हातानं ते एका पुस्तिकेचे प्रकाशन करू लागलेले आहेत. म्हणजे आम्ही आमच्या गावात ५-७ राज्यातले लोक येवून काम बघून गेले, माझ्या गावाची कंडिशन तर अशी होती की पाणीच मिळत नव्हतं. आमच्या गावाला प्यायला पाणी नव्हतं. आणि पाणी नव्हतं आम्ही जे काम केले ते तुम्हाला त्याचा चमत्कार सांगतो की गावातल्या सगळ्या लोकांनी नाल्याच्या कडेनं विहीर खणल्या, आणि सगळे मळे झाले आहेत आता, एवढा प्रचंड पाण्याचा साठा झाला म्हणजे खानापूरकरांनी जो चमत्कार शोधून काढला आणि त्या चमत्कारामुळे एवढं प्रचंड काम उभे झालं, आणि आता लोकांनी त्याच्यावर लोकांची भक्ती सुध्दा बसली आहे. आता अडचण अशी आहे की, आता सध्या त्याच्यावर जरा काम कमी होवू लागलं, का तर पाऊस न पडला तरच त्याची याद येते लोकांना, पाऊस पडला तर कशाला करतील लोकं.

तर अशा पध्दतीचा एक अवलिया माणूस महाराष्ट्राला सुरेश खानापूरकर यांच्या निमित्ताने मिळाला. आणि मी साक्षीदार आहे मी काही साहित्यिक नाही म्हणजे न पाहिलेली वस्तू कशी चांगली असते असे लिहिणारा मी काही साहित्यिक नाही. आणि मी कार्यकर्ता असल्यामुळे हे सगळ झालेलं काम माझ्या डोळ्यांनी याची देही याची डोळा बघितलं आणि ते करून पण घेतलं. तर असा या माणसाला ७५ वर्ष पूर्ण होत आहेत, मला असे वाटते की हा महामाणूस १०० वर्षे जगला पाहिजे आणि या माणसाच्या हातून महाराष्ट्र नाही तर एशियाची सेवा घडली पाहिजे, का तर हा जो सिध्दांत आहे त्यांचा पाणी अडवा पाणी जिरवा आता यावर काही आरोप करतील, काही प्रत्यारोप करतील परंतु आरोप प्रत्यारोप करणारे महान असतात त्यांना त्यांचे मार्ग वेगळे असतात मी तुम्हाला फक्त बंसरळा गावाचे सांगितले तसे तुम्हाला चमत्कार सांगतो. एक ---- नावाचं औसा तालुत्यातलं गाव त्या गावाला पाणी नव्हतं, ते गाव एकेकाळी माझ्यावर प्रचंड प्रेम केलेले आहे. मी आहे दिवशी गावात गेलो, लगळं गाव जमलं म्हंटलं पटेल साहेब आमच्या गावाला नदी आहे हो, पण पाणी नाही, प्यायच्या पाण्याचं करा हो काहीतरी. आता मला खासदार काकडे च फंड म्हणजे मी स्वत: खासदार असल्यासारखं वागत होतो त्या काळामध्ये. मी तिथे लगेच म्हंटल चला, तुमच्या गावाला पाणी देतो. यग बघा, योग .... घटना कशी बघा....ही माझ्या आयुष्यातली घटना मी विसरूच शकत नाही, ते म्हणले बघा कुणी मशीन वाला येतो का, मग एक मशीन वाला बोलवला आणि गावात बसलो आम्ही, बैठक घेतली, ५ लाख रूपये फंड देतो म्हणाले तो पर्यंत कोण मशीनवाल्याला बोलवले, त्याला उधार काम चालू कर मग लेगच फंडातून पैसे देतो सांगितले. पहिलं नारळ फोडलं आणि मशीन सुरू केली. ८ दिवस नाला खणला आम्ही त्या गावचा, ९ व्या दिवशी योग बघा उन्हाळ्यात पाऊस पडला हो.... उन्हाळा होता, अवकाळी पाऊस पडला, मशीन बाहेर निघालेली, म्हणजे मशीन काढायला प्रॉब्लेम झाला. पाऊस पडला आणि ते ५-७ फूट खोल खणले होते, सगळा ओढा भरला, आणि संध्याकाळी अख्ख्या गावातल्या विहीरी आणि बोअर सुरू झाल्या. म्हणजे जसं बटन दाबलं की लाईट लागतीय, मग आता पहिल्यांदा लाईट बघणाऱ्याला वाटतं काय चमत्कार आहे राव इकडं बटन दाबलं की तिकडे प्रकाश पडला बघा... तर त्या पध्दतीनं पाणी आणण्याचा चमत्कार सुरेश खानापूरकरच्या थीयरी मधे मला दिसला, आणि म्हणून मी या विषयातले २-४ वर्ष मी खूप पूर्णपणे या कामामध्ये मी काम केलं. तर सुरेश खानापूरकर आमचे मित्र आहेत, खरंतर त्यांच्याकडून अजून खूप अपेक्षा आहे म्हणजे महाराष्ट्राला का आता तर हे इंटर Governmental पॅनल फॉर Environment चा आता जो काय रिपोर्ट आलेला आहे त्या रिपोर्ट प्रमाणे आता ५२ तासच पाऊस पडून जाणार आहे. १०० दिवसांचा पाऊस जर का ५२ तासात जर का पडून जाणार असेल तर मग आता काय बदलावे लागणार आहे, सगळी Concept बदलावी लागणार आहे. आता निसर्ग काय आपल्या बापाचा गुलाम नाही आहे, तो आता कसा बी त्याच्या त्याच्या रूपाने येवून जाणार आहे, आणि त्याच्या पध्दतीने पडणार आहे, आणि म्हणून आम्हाला आता नवीन शिकावं लागणार आहे, काय शिकावं लागणार आहे की आता मला आठवतंय की आता हे बंधारे आपण करतो आहे हे बंधाऱ्याचे स्वरूप सुध्दा बदलावे लागेल की काय, असा प्रश्न पडतो का तर आता पाऊसच एवढा विचित्र पडणार आहे की आता जसा पूर्ण जून मध्ये पाऊस पडला महाराष्ट्रात देशात कुठेच ढगफुटी झालेली आहे, आणि आता १५-२० दिवसांनंतर खंड पडला, पाऊसच नाही आणि आता पुन्हा पाऊस येणार आहे तर ढगफुटी सुरू होवू लागली. की याचा अर्थ असा की पावसाचे स्वरूपच बदलले आहे, आणि मग अशा बदललेल्या परिस्थितीत मधे मला वाटते पुन्हा टेक्निक पण बदलावे लागतील की काय, नाहीतर आता एक काम करावे लागणार आहे, निसर्ग आपल्या पध्दतीने येणार , मग आपण निसर्गाला सांगावं लागणार आहे की बाबा कधीही ये, कितीही ये, कसं ही ये, मला जेवढं लागतं तेवढं मला साठवून ठेवावे लागणार आहे, म्हणजे साठवण्याची ही जी कल्पना आहे खानापूरकरांची ती आहेत, त्याच्यामध्ये सुध्दा आता नवीन नवीन अजून काही बदल करणे गरजेचे आहे, नंतर नंतरच्या काळात त्यांनी शिरपूर मध्ये प्रचंड खोल आणि प्रचंड रूंद येवढे सगळे ३०-३५ फूट खोल त्यांनी जलसाठे केले आणि त्यांच्यावर आरोप करणारे खूप लोक होते, ही पध्दत नाही, एवढं कुठे खंदायचं असतं का, वगैरे वगैरे..... अरं मग आता १०० दिवसाचा पाऊस जर ५२ तासाच येवून जाणार असेल तर काय करणार आहात तुम्ही, टँक बांधणार आहात का, मग पुन्हा आणा सिमेंट, मग पुन्हा प्रदूषण म्हणजे काही वेडेपणाला मर्यादा असतात. परंतु या सगळ्या गोष्टी बघता हे आता पर्यंत किती गरज होती खानापूरकरांच्या टेक्नॉलॉजीची मला माहिती नाही, परंतु ह्याच्या पुढे याच्याशिवाय पर्यायच नाही. याच्यामुळे या सगळ्या गोष्टी फार गांभीर्यानं

घ्याव्या लागणार आहेत, आणि या निमित्ताने मी खानापूरकर साहेबांकडे अपेक्षा व्यक्त करतो की आता फिल्डवर पळत हिंडण्यापेक्षा आता तुम्ही रिटायर होवून पण मला वाटते २० वर्ष झाले, आता ते नोकरीच्या काळात तर करावेच लागते, रिटायर झालेला माणूस २० वर्ष फिरतो आणि आज पण तरूणाला लाजवेल एवढा काम करू शकतो तर आता हे जे नवे Challenge तयार झालेले आहे त्याच नवीन पध्दतीने जो पाऊस पडणार आहे, याच्याच सुध्दा ब-याच गोष्टी आपण शोधून आता खरं खानापूरकरांच्या कामाची गरज पडणार आहे असं मला दिसतं, आणि म्हणून मी खानापूरकरांना माझ्या लाख लाख शुभेच्छा देतो आणि भविष्या मध्ये ते या सर्व गोष्टी अजून प्रयत्नपूर्वक शोधून काढतील आणि मानवजातीच्या भल्या साठी काम करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो, आणि खानापूरकरांना माझ्या आणि माझ्या संस्थेच्या वतीने लाख लाख शुभेच्छा देतो.

*****



## श्रीराम

संकल्प जलनियोजनाचे घेऊनी मनी
ग्रामस्थांना दिले लाखमोलाचे पाणी
जलामृताचे महत्व जाणले जीवनी
वनराई वाचवावी ही एकच मागणी

वनीकरण पावसाचा मूळ स्त्रोत
जलसंधारण करणे गरज ही नितांत
त्यायोगे सुखसमृध्दी लोककल्याणहित
माथा ते पायथा हे तत्व अंगिकारीत

सुजलाम सुफलाम करण्या वृध्दिंगत होई जलसाठे
पाणलोट क्षेत्र विकसित होईल ही पूर्ण खात्री वाटे
पाणी अडवा पाणी जिरवा हे सुरेशचे ठाम मत
असा हा माझा ध्येयासक्त बंधू वैदर्भिय भगिरथ

**सौ. भाग्यश्री जयंतराव कुसरे**





# श्री. खानापूरकर यांना हार्दिक शुभेच्छा !!-

**श्री.संजय झेंडे**

**मो : ०९६५७७१७६७९**



राज्याच्या उत्तरेला असलेल्या तापी नदी खोऱ्यात वसलेल्या शिरपूर तालुक्याचे नाव आज जलसंधारणाच्या क्षेत्रात आदराने घेतले जाते. शिरपूर तालुका उत्तर महाराष्ट्रातील एक समृध्द तालुका म्हणून ओळखला जातो. धुळे जिल्ह्यातील धुळे, साक्री आणि शिंदखेडा या तीन कायम अवर्षणप्रवण तालुक्यांपेक्षा शिरपूर तालुक्यात पर्जन्यमान तुलनेने समाधानकारक. उर्वरित तीन तालुक्यांमध्ये तुटपुंज्या पावसाचा परिणाम शेतीवर पर्यायाने संपूर्ण जनजीवनावर झालेला दिसतो. शिरपूरमध्ये तापी, अनेर आणि अरूणावतीचे विपुल पाणी उपलब्ध आहे. 'कर्जबाजारी शेतकऱ्यांची आत्महत्या' अशा स्वरूपाचा प्रसिध्द झालेल्या बातम्या बहुतांश धुळे, साक्री आणि शिंदखेडा तालुक्याशी संबंधित असतात. 'खाई खाई खत केलं अन् कर्जात शेत गेलं' अशा कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांच्या पंक्तीत शिरपूरचे शेतकरी बसत नव्हते. तथापि, कालौघात जलपिपासू ऊस लागवडीचा अतिरेक मुळावर उठला. विजेचे पंप आल्यानंतर पाण्याचा उपसा वाढला. जमिनीतून पाणी उपसण्याचा वेग प्रचंड. तुलनेत जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण कमी. तापी काठावरील भूस्तर रचना वेगाने पाणी झिरपण्यास प्रतिबंद करणारी. दिवसेंदिवस पाणी पातळी खालावत चाललेली. शंभर फूटांपर्यंत खोदलेल्या विहिरींनी देखील 'राम' म्हंटले. नंतर मंडळींनी उपशासाठी ठिकठिकाणी कूपनलिका खोदल्या. त्यांची खोलीसुध्दी ८०० फुटांपर्यंत गेली. जमिनीची चाळणी करण्याची अहममिका सुरू झाली. त्याही आटू लागल्या तेव्हा आमदार अमरिश पटेल यांना भविष्यातील संकटाची चाहूल लागली. हा विषय केवळ चिंतनाचा नसून प्रत्यक्ष कृती करण्याचा आहे ती देखील तातडीने. हे त्यांनी हेरले. कृत्रिम भूजल पुनर्भरण केल्याशिवाय खालावलेली पातळी वर येणार नाही गे लक्षात येण्यास त्यांना वेळ लागला नाही. सन २००५ पासून त्यांनी जलसंधारणाच्या प्रत्यक्ष कामास सुरूवात केली. निवृत्त भू-वैज्ञानिक सुरेश खानापूरकर यांची नियुक्ती त्यांनी या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केली. त्यावेळी आमदार पटेल शिरपूरच्या प्रियदर्शनी सहकारी सूतगिरणीचे अध्यक्ष होते. या सूत गिरणीच्या नफ्यातून जलसंधारणाच्या कामांसाठी भरीव तरतूद करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आणि या निमित्ताने शिरपूर तालुक्याचा चेहरा मोहराच नव्हे तर अंतर्गत भूगर्भ जलमय करण्याच्या एका महत्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी सुरू झाली.

**ध्यासपर्व :**

काम करण्याचे स्वातंत्र्य आणि निधीचा शाश्वत स्त्रोत यांस जोड मिळाली ती सुरेश खानापूरकरांच्या निस्वार्थी आणि अभ्यासू मनोभूमिकेची. तसेच कोणतेही काम झोकून देत तळमळीने करण्याच्या निग्रही मानसिकतेची. झपाटलेल्या खानापूरकरांनी पाणी 'अडवा पाणी मुरवा' या कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना नंतर मागे वळून पाहिले नाही. आरंभी केलेल्या सर्वेक्षणानुसार टप्प्याटप्प्याने अतिशय नियोजनबध्द पध्दतीने त्यांनी काम सुरू केले. पहिल्या टप्प्यात शिरपूर तालुक्यातील अर्थे बु., अर्थे खुर्दे, भरवाडे, सुभाषनगर व शिंगावे आदि सात गावातील १६ विहीरी पुनर्भरण प्रकल्पाचे काम पूर्ण झाले. त्यानंतर दहिवद, गरताड, तांडे, असली, भोरखेडा, सावेर व तरडी गावातून वाहत जावून तापी नदीला मिळणाऱ्या एकाच नाल्यावर तब्बल १६ बंधाऱ्यांचे काम करण्यात आले. सन २००८ पर्यंत अशा आठ नाल्यांवर एकूण ४५ बंधाऱ्यांचे काम पूर्ण झाले होते. अलीकडे बंधाऱ्यांची संख्या २५५ च्या घरात पोहोचली आहे. एरव्ही या विविध नाल्यांमधून वाहत पुढे तापी नदीच्या माध्यमातून अरबी समुद्राला समर्पित होणारे किती कोटी लिटर पाणी अडविले गेले याची मोजदाद करणेही अवघड आहे. एक मात्र नक्की या बंधाऱ्यांच्या निमित्ताने पाणी थांबले आहे. जमिनीत ते झिरपले आहे, त्यामुळे जवळपास ६५ गावांच्या परिसरातील कूपनलिका आणि विहीरींची पातळी वाढली आहे. यासाठी कराव्या लागलेल्या तांत्रिक करामती कोणत्या या तपशीलात जाण्याची स्थानिक शेतकऱ्यांना आवश्यकता वाटत नाही. शेतात फुललेला भाजीपाला, कापूस, मका आणि कांदा आपल्याला किती पैसे मिळवून देणार या हिशेबात ते दंग आहेत.





यशस्वितेवर शासकीय मान्यतेची मोहोर यापूर्वीच उमटली आहे.

सुरेश खानापूरकरांनी शिरपूर पॅटर्न राबविण्यास सुरूवात केली ती सन २००४ मध्ये. तंत्रविज्ञानाचा अंगीकार, त्यास भूस्तराच्या सूक्ष्म अभ्यासाची जोड आणि परिसराचा कायाकल्प घडवून आणण्याच्या जिद्दीने प्रेरीत होवून उन्हातान्हात, रात्रंदिवस घेतलेल्या परिश्रम, या त्रिसूत्रीचा एकत्रित परिपाक म्हणजे शिरपूर पॅटर्न. माजी शिक्षणमंत्री आमदार अमरिश पटेल यांच्यासारख्या व्हिजन असलेला भरभक्कम पाठीराखा लाभणे हा शिरपूर पॅटर्नच्या यशस्वीतेचा मूलाधार. याबाबी एकवटल्यामुळेच तापीकाठावरील नागरिकांचे भाग्य बदलले.

पाणी पातळीत झालेली वाढ ही शिरपूर पॅटर्नची पहिली उपलब्धी. काही वर्षांपूर्वी केवळ एक पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या वार्षिक कोष्टकात आता तिसऱ्या पिकाचे नियोजन दिसू लागले आहे. परिणामस्वरूप शेतीमालाची आवक वाढल्याने साठवणीचा प्रश्न निर्माण होण्यासारखे प्रसंग देखील उद्भवले, त्यामुळे शिरपूर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीस पंधरा दिवस आपले व्यवहार बंद ठेवावे लागले होते. ज्या धुळे जिल्ह्यात चार पैकी तीन तालुके सतत अवर्षणप्रवण आहेत, त्या सरासरी पर्जन्यमान ६०६ मिमी असलेल्या जिल्ह्यात शिरपूर पॅटर्न म्हणजे जलक्रांतीसाठी जणू जादूची कांडी ठरली आहे. एकेकाळी ७०० – ८०० फुटांपर्यंत खोल गेलेली पाण्याची पातळी ७० – ८० फूटावर आली. परिसराचे चित्र बदलले. गेल्या वर्षीच्या भूजलाची ह्या वर्षीच्या पावसाशी भेट होत असल्याचे अत्यंत दुर्मिळ असे दृष्य दिसणे आता नित्याचे झाले आहे. शिरपूर पॅटर्नच्या माध्यमातून ही किमया साखणारे सुरेश खानापूरकर विदर्भवासी म्हणून ओळखले जातात. अर्थात त्यांचे बालपण, शिक्षण आणि नेकरीचा बहुतेक कालावधी विदर्भातच व्यतीत झालेला आहे. तथापि खानापूरकरांचे घराणे तसे खान्देशातले. जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील खानापूर हे त्यांचे मूळ गाव. आजोबांनी नोकरीनिमित्त खानापूर सोडले आणि पुढील पिढ्यांची प्रपंचासाठी भटकंती सुरू झाली. शिरपूर पॅटर्नच्या निमित्ताने एक वर्तुळ पूर्ण झाले असेच म्हणावे लागेल.

**जडणघडण :**

शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात ग्रंथ आणि ग्रंथालयांचा लाभलेला सहवास भावी आयुष्यास कलाटणी देण्यासाठी किती प्रभावशाली ठरू शकतो याचे उदाहरण शोधायचे असेल, तर गुगलवर जावून सर्च करण्याची आवश्यकता नाही. खान्देशात शिरपूर पॅटर्नच्या माध्यमातून तापीनदीच्या उत्तर तीरावर जलयज्ञ आरंभलेल्या सुरेख खानापूरकरांचा भूतकाळ जाणून घेतला तर शालेय जीवनात वाचनात आलेल्या केवळ दोन लेखांमुळे पाण्याच्या या किमयागाराच्या आयुष्यात झालेले परिवर्तन सहज लक्षात येईल. विदर्भातल्या एका छोट्या खेड्यात इयत्ता सहावीत सुरेश खानापूरकर शिकत होते. त्यावेळी नागपूरहून प्रसिध्द होणाऱ्या उद्यम नियतकालिकेतील एक लेख त्यांच्या वाचनात आला. या लेखात मराठी तरूणांनी काहीशा दुर्लक्षित भूगर्भ शास्त्र या क्षेत्राकडे वळावे या अनुषंगाने प्रेरणा देणारा मजकूर होता, मराठी तरूणांना स्वत:च्या घरामागे, गावात नोकरी हवी असते, भूगर्भशास्त्र यासारख्या आव्हानात्मक क्षेत्रात येण्याचे धाडस ते करत नाही अशा आशयाचा मजकूर या लेखात होता. त्याचवेळी छोट्याशा सुरेशने भूगर्भशास्त्रज्ञ होण्याची खूणगाठ मनात बांधली, त्यानुसार नववीत असताना त्यावेळेच्या पध्दतीनुसार विषय बदलविले. पुढए एम.एस्सी होवून ते भूगर्भ शास्त्रज्ञ झाले. दहावीत असताना त्यावेळी शाळेत येणाऱ्या एका इंग्रजी मासिकातील लेख वाचण्यात आल्यानंतर श्री गजानन महाराजांची नियमित पारायणे करणाऱ्या खानापूरकरांनी मूर्तीपूजा आणि कर्मकांडाची कास सोडली आणि कर्म भक्तीची आराधना सुरू केली.

राज्याच्या भूजल सर्व्हेक्षण विभागातून वर्ग एक श्रेणीतील वरिष्ठ भूगर्भशास्त्रज्ञ या पदावरून निवृत्त झालेल्या सुरेश खानापूरकर यांनी तंत्राधारित जलसंधारण कार्यक्रम अंमलात आणून संपूर्ण महाराष्ट्राचेच नव्हे तर आता देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. शिरपूर पॅटर्न या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या जलसंधारण प्रयोगाची उपयोगिता आणि





अवघा महाराष्ट्र टँकर मुक्त होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या खानापूरकरांचा शिरपूर पॅटर्नमध्ये प्रवेश झाला तोच मुळी धुळे जिल्ह्यातील एक गाव टँकरमुक्त केल्याच्या निमित्ताने. भूवैज्ञानिक वर्ग – १ या पदावर असलेल्या खानापूरकरांची बहुतांश सेवा विदर्भ आणि मराठवाड्यात झालेली. नोकरीच्या अखेरच्या टप्प्यात सन २००४ मध्ये ते धुळ्यात आले. शिवकालीन पाणी पुरवठा योजनेअंतर्गत त्यांनी बेटावद गावात स्थानिक पाणी पुरवठा योजनेचे सक्षमीकरण केले, त्यामुळे संपूर्ण गाव टँकर मुक्त झाले. त्याबद्दल ग्रामपंचायतीने त्यांचा सत्कार करण्याचे ठरविले होते. या कार्यक्रमास आमदार अमरिश पटेल यांना देखील निमंत्रित करण्यात आले होते. याच कार्यक्रमात अमरिशभाईंना जाणवले ते खानापूरकर हे वेगळे पाणी आहे. त्यानंतर संपर्क वाढला, आणि खानापूरकरांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी म्हणजे ३० सप्टेंबर २००४ रोजी अमरिश पटेल यांनी निमंत्रित केले. खानापूरकरांनी आपल्या संघ समर्पित विचारसरणीची कल्पना दिल्यानंतरही त्यावेळी काँग्रेसचे आमदार असलेल्या पटेल यांनी आपला निर्णय बदलला नाही.

दुष्काळ आणि महापूर या जोन्ही समस्यांवर शिरपूर पॅटर्न हे एकमेव उत्तर आहे, हा सुरेश खानापूरकरांचा दावा या प्रयोगांची यशस्वीता पाहिल्यानंतर चटकन पटतो. तापीच्या उत्तर तीरावर भूगर्भाचे प्रयत्नपूर्वक उदरभरण करून खानापूरकरांनी जलयज्ञ आरंभला. या जलयज्ञाला शास्त्राधार आहे. तशी खानापूरकरांची तात्विक बैठक देखील आहे. आपल्या वाट्यास आलेले काम प्रामाणिकपणे करा, समोर आलेल्याचे दैन्य दुखः कमी करण्यास हातभार लावा. एखाद्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यास आपण कारणीभूत असलो तर ते जास्त आनंद व समाधान देणारे असते, या धारणेतून माझी वाटचाल सुरू आहे. किंबहुना हेच माझे अध्यात्म आहे. हेच माझे श्रध्दास्थान आहे. असे खानापूरकर सांगतात. तेव्हा पाण्याच्या या जादूगाराचे मूळ बलस्थान लक्षात येते.

सेवानिवृत्तीनंतर एळाद्या महानगरात स्थानिक होणे खानापूरकरांना सहज शक्य होते. आयुष्यभर नोकरीनिमित्त भ्रमंती सुरू होतीच. वडील रेल्वेत नेकरीस असल्याने सतत बदल्या होत. त्यामुळे साधारण दरवर्षी नवीन शाळा. असा पॅटर्न दहावीपर्यंत खानापूरकरांनी अनुभविला. विदर्भातील लहानमोठ्या गावांमध्ये त्यांचे नववीपर्यंतचे शिक्षण झाले. मात्र पहिली पासून प्रथम क्रमांक कधी त्यांनी सोडला नाही. छोट्या सुरेश मधील गुणवत्ता हेरलेल्या नंदनपवार नावाच्या शिक्षकाने त्यांना दहावीसाठी नागपूरला नवयुग हायस्कूलमध्ये प्रवेश मिळवून दिला. १० वीला त्यांना ८२ टक्के मार्कस् मिळाले. मात्र गुणवत्ता यादीत येण्याची संधी अवघ्या ३ मार्कांनी हुकली. त्याचे शल्य मनात असतानाच वडीलांनी पुढील शिक्षणासाठी लाल झेंडी दाखविली. एखादी गोष्ट दुसऱ्याच्या गळी उतरविणे हा खानापूरकरांचा हातखंडा. वडिलांकडून त्यांनी १५ रूपये मिळविले आणि नागपूरमधील मथुरादास मोहता कॉलेज ऑफ सायन्स गाठले. माझ्याकडे १५ रूपये आहेत, उर्वरित फी माझ्या स्कॉलरशिपमधून कापून घ्या असे धीटपणे सांगणारा नुकताच १० वी पास झालेला मुलगा पाहून प्राचार्य बापूराव व्हाडपांडे चमकलेच. त्यांनी मार्कशीट पाहण्यास मागितले आणि प्रवेश देण्यास हरकत नाही असा शेरा लिहिला. प्रवेश तर मिळाला, उर्वरित २८५ रूपये आणायचे कुठून या प्रश्नाने छोट्या सुरेश ची चिंता वाढली. तेव्हा एका पेपर विक्रेत्याकडे त्यांनी काम मिळविले. नागपूरमध्ये सायकलीवर दररोज २२ कि.मी फिरून ३०० घरांमध्ये पेपर टाकण्याचे काम सुरू झाले. पुढे अपेक्षेप्रमाणे स्कॉलरशिपी मिळाली. त्यातून आईसाठी शिलाई मशीन घेतले, खानावळ सुरू केली अशा संघर्षमय वाटचालीतून एम.एस्सी झालेल्या खानापूरकरांना शिक्षण पूर्ण होत असतानाच राज्य शासनात सहाय्यक भूवैज्ञानिक या पदावर नोकरी मिळाली. सन २००४ मध्ये निवृत्त झाले तेव्हा ते वर्ग १ वरिष्ठ भू वैज्ञानिक या पदावर कार्यरत होते.



# पाणी आणि सुरेश खानापूरकर

**श्री. अनिल पाटील**

**मो : ९८२२६०४८७**



आपल्या मानवी जीवनात पाण्याला अनन्य साधारण महत्व आहे. पाण्याशिवाय आपला विकास होवू शकत नाही. म्हणूनच आपण पाण्याला जीवन म्हणतो आणि नद्यांना जीवनदायिनी म्हणतो. सर्वसमावेशक व दीर्घकालीन टिकणारा विकास साधण्यासाठी पाण्याची हमी आपल्याला गरजेची असते.

भारत देश देव्हा स्वतंत्र झाला तेव्हा आपली लोकसंख्या ३५ कोटी होती ती आज १३५ कोटी झाली आहे. तर महाराष्ट्राची लोकसंख्या ३ कोटीवरून १२ कोटीवर पोहोचली आहे. वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज भागवण्यासाठी, जनतेला पिण्यासाठी, पशुधनासाठी, पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे आणि भविष्यातही वाढत राहणार आहे. भारत देशामध्ये आजमितीस जवळपास ५७०० मोठी धरणे बांधली आहेत आणि आपल्या महाराष्ट्रामध्ये त्यापैकी जवळपास ४० टक्के धरणे म्हणजे २४०० मोठी धरणे बांधली आहेत. एवढी धरणे असूनसुध्दा आपल्या राज्यातील १७ टक्के पेक्षा अधिक जमीन सिंचनाखाली येवू शकलेली नाही.

आपल्या राज्यातील सिंचन व्यवस्था व भविष्यकालीन योजनांचा अभ्यास करता ३० टक्के क्षेत्र सिंचनाखाली येवू शकेल असा अंदाज सरकारने नेमलेल्या तज्ज्ञांच्या समितीने दिला आहे. म्हणजे



आज ८३ टक्के क्षेत्र पावसाच्या भरवशावर आहे आणि पुढे अरबो रूपये खर्चून देखील ७० टक्के क्षेत्र कायम पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहणार आहे हे निश्चित. अशा वेळी पाणलोट क्षेत्रनिहाय सूक्ष्म योजनांच्या आधारे आपण सिंचन क्षेत्र वाढवू शकतो का ? शेतीच्य, ग्रामीण जनतेच्या पिण्याच्या पाण्याची व पशुपालनाच्या पाण्याची सोय करू शकतो का ? असा विचार करून तो कृतीत आणण्याचे काम करणाऱ्या ७५ वर्षीय तरूणाचे नांव आहे श्री. सुरेश खानापूरकर.

राज्य शासनाच्या भूजल विभागामध्ये नोकरी करताना मा. आमदार श्री. अमरीशभाई पटेल यांच्या सारख्या विकासाभीमुख नेत्याची गाठभेट झाली आणि सामान्य व पाण्यापासून वंचित असणाऱ्या शिरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे भाग्य बदलण्यास सुरूवात झाली. श्री. सुरेश खानापूरकर यांच्या चिंतनाचा व भूगर्भीय अभ्यासाचा उपयोग करून पाणी अडवण्याची, ते भूगर्भात जिरवण्याची व त्या पाण्याचा योग्य उपयोग करून परिसराचा कायापालट करण्याची योजना स्थापित झाली. पुढे या योजनेचे अनेक भागात अनुकरण केले गेले तरी म्हणजे 'शिरपूर पॅटर्न'.

नैसर्गिक भुरचनेचा व त्यामधील चढ उताराचा अभ्यास करून गाव शिवारातील ओघळ, नाले, ओढे खोल करून पाणी अडवण्याच्या कामाचा शुभारंभ केला. हे करत असताना कोणत्या ठिकाणी व किती खोलीपर्यंत खोदकाम केल्यावर भूगर्भ पातळी वाढेल याचा प्रत्यक्ष साईटवर जावून खानापूरकरांनी अभ्यास केला व त्यानुसार खोली केली व बंधारे बांधले. शिरपूर पॅटर्न सारखीच परंतु अभ्यास न करता शासकीय तसेच शासनाने पुरस्कृत केलेल्या सेवाभावी संस्थांनी कामे केली. ती बऱ्याच प्रमाणात फेल झाली. मात्र धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील जल संवर्धन व पुनर्भरण काम १०० टक्के यशस्वी झाले. याचे मुख्य कारण श्री. सुरेश खानापूरकर यांच्या तांत्रिक ज्ञानामध्ये, भूगर्भाच्या रचनेच्या अभ्यासमध्ये आणि त्यांनी काम करताना घेतलेल्या कष्टामध्ये आहे हे अधोरेखित होते.

अनेक वर्षांपासून शिरपूर पॅटर्नची कागदावर माहिती होती. ही योजना प्रत्यक्ष पाहण्याची, अभ्यासण्याची व यो योजनेमुळे फायदा होत असलेल्या शेतकरी बांधवांशी चर्चा करण्याची संधी मला ऑक्टोबर २०२० मध्ये मिळाली. स्वत: श्री. सुरेश खानापूरकर यांच्या समक्ष शिरपूर परिसरात केलेल्या कामाची माहिती घेतली. योजनेची व्याप्ती खूप मोठी असून त्याबाबतची माहिती सर्वत्र उपलब्ध आहे. मात्र योजनेमधून निर्माण झालेले वैभव म्हणजेच पाणी वापरून शेती फुलवून वाढवलेले उत्पन्न पाहून व शेतकऱ्यांसोबत बोलून लक्षात आले. अगदी



थक्क करणारे अनुभव शेतकऱ्यांनी कथन केले. तेव्हा मला पुराण कथेतील भगीरथासोबत श्री. सुरेश खानापूरकर यांची तुलना करावीशी वाटली.

महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर धरणे बांधून पाणी अडवून शेती ला पाणीपुरवठा व पिण्याला पाणी देण्याचा शासनाचा प्रयत्न असला तरी एकूण सिंचनाखालील क्षेत्रापैकी ६० टक्के हून अधिक क्षेत्र भूजलाच्या पाण्यावर अवलंबून आहे तर ५० टक्के हून अधिक जनता भूजलाच्या पाण्याने आपली तहान भागवते हे वास्तव आहे. मोठी धरणे आवश्यकच आहेत. सोबत पाणलोट क्षेत्राचा शास्त्रोक्त अभ्यास करून त्या ठिकाणी जल संधारणाचे काम आवश्यक आहे. त्यासाठी श्री. सुरेश खानापूरकर यांच्यासारख्या भगीरथाचे अनुभव सरकारने स्वीकारून त्यावर अंमल करण्याची गरज आहे. सन २००५ मध्ये आम्ही महाराष्ट्रातील 'सहकारी उपसा जलसिंचन योजना – अडचणी व उपाययोजना' या विषयाची राज्यस्तरीय कार्यशाळा घेतली होती तेव्हाच आमच्या लक्षात आले होते की भूजल हाच मोठा स्त्रोत आहे. त्याचे संवर्धन व त्यामध्ये वृध्दी करण्याचे काम 'शिरपूर पॅटर्न' सारख्या योजना करतात व अशी कामेच महाराष्ट्रातील जलक्षेत्राला उपयुक्त ठरणार आहेत. म्हणूनच आधुनिक काळातील भगीरथ श्री. सुरेश खआनापूरकर यांना त्यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्ता हार्दिक शुभेच्छा !!

*****



# मागे वळून पाहताना

**सौ. सुमेधा सुरेश खानापूरकर**



हया वर्षी हयांना वयाची ७५ वर्षे पूर्ण होतात आणि आमच्या लग्नाला ४८ वर्षे. माझ्या लग्नापासून ते आजपर्यंतचा जीवनपट डोळयासमोरून सरकू लागला. ते १९७० साल असेल. मी माझे आजोबा म्हणजे आईचे वडिल कै. नानासाहेब देशपांडे यांचेकडे हनुमाननगरला शिकायला होती. शेजारीच माझी मावशी रहात असे. आजोबांकडे संघाचे काही साप्ताहिके टाकायला एक कॉलेजमध्ये जाणारा तरूण मुलगा येत असे. आजोबांशी त्या मुलाची विविध विषयांवर चर्चा होत असायची. त्या चर्चेतूनच मला कळले की हा मुलगा भूगर्भशास्त्र या विषयात एम्.एस् .सी.ला दुसऱ्या वर्षाला आहे. हेही कळले की शाळेत असतांना सहाव्या वर्गातच याने ठरविले की भूगर्भशास्त्र या विषयात एम्.एस्.सी. करावयाचे. परिस्थितीमुळे कॉलेजची फी भरणे शक्य नव्हते म्हणून हा पेपर वाटून कॉलेजची फी भरायचा. आजोबांकडे वा मावशीकडे भेट झाल्यावर जुजबी बोलणे व्हायचे. १९७१ त्याने एम्.एस् .सी.ची पदवी मिळवली व लगेचच त्याला शासकीय नोकरी लागली. या बोलण्यातूनच आम्ही दोघे केंव्हा एकमेकाकडे आकर्षित झालो हे आम्हा दोघांनाही कळले नाही. मलाही क्षणभर असे वाटून गेले की असा हुशार, कष्टी, होतकरू मुलगा त्यातही संघसंस्कारित असा मुलगा आपल्याला नवरा म्हणून मिळाला तर किती बरे होईल. एक दिवस दुपारी मात्र अघटितच घडले तो मुलगा म्हणजेच सुरेश खानापूरकर सरळ माझ्या आईकडे आले व म्हणाले तुमच्या माधुरीशी मला लग्न करावयाचे आहे तुमचा याला होकार आहे का? आईने सांगितले की आमचा होकारच. विरोध फक्त खानापूरकरांकडेच होता. शेवटी सुरेशच्या आईचा प्रखर विरोध असतांनाच २२ फेब्रुवारी १९७३ ला आमचा विवाह पार पडला व मी माधुरी पांडेची सुमेधा खानापूरकर होउन खानापूरकरांच्या घरी प्रविष्ट झाली.

लग्नाला वर्ष व्हायच्या आतच यांना बढती मिळून हे वर्ग २ चे शासकीय अधिकारी झाले व यांची बदली यवतमाळला झाली. त्यावेळी मी जेमतेम २० वर्षाची असेन. खेडोपाडी कापडी तंबू लावून यांचे पाण्याचे सर्वेक्षणाचे काम चालायचे.सोमवारी गेल्यावर हे शनिवारीच परत यायचे. अतुल एक वर्षाचा होता. त्याला सांभाळून यवतमाळला सहा वर्षे काढले. कधी कधी मी सुध्द १५ –१५ दिवस यांचे बरोबर तंबूत राहीली आहे. कोणतेही काम प्रामाणिकपणे, सचोटीने व इमानदारीनेच करावयाचे हा यांचा गुण मला फारच भावला.

त्यानंतर आमची बदली झाली वर्धेला. तेथे माझ्या सासऱ्यांनी एका रेल्वे कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण सोसायटी मध्ये एक घर बांधले होते. त्या संस्थेत कोणत्याच पदाधिकाऱ्याने व्यवस्थित लक्ष न घातल्याने त्या सोसायटीचा लिलाव व्हायची वेळ आली. कोणाचेच दुख व कोणावरही झालेला अन्याय सहन न करण्याची वृत्ती असल्यामुळे हयांनी त्या सोसायटीचा कारभार हाती घेतला. त्या सोसायटीचे सर्व रोख पुस्तके, ताळेबंद दुरूस्त करून सर्व सदस्यांकडून थकीत रक्कम वसूल केली व सोसायटी मुदतीआधी ५ वर्षे कर्जमूक्त केली. सर्व सभासदांना त्यांची घरे हस्तांतरित केली. घरातली सर्व कामे, मुलांचा सांभाळ मला एकटीलाच करावे लागे. हे आपले ऑफीस मधून आले की तसेच सोसायटीच्या कामाला जायचे. मी खूप त्रासून जायची. यांना नेहमी त्राग्याने म्हणायची सुध्दा की तुम्ही लग्न माझ्याशी केले की सोसायटीशी? पण नंतर यांचे हे सर्व सामाजिक काम पाहून माझा राग शांत व्हायचा.

अन्याय, भ्रष्टाचार यांना अजिबात सहन होत नाही हे मला प्रकर्षाने जाणवले ते भंडारा येथे असतांना. आम्ही भंडाऱ्याला होतो १९८५ ते १९८८. सामाजिक जीवनात झालेला भ्रष्टाचार व त्याविरूध्द हयांनी दिलेला लढा माझ्या अजून स्मरणात आहे. त्याचे झाले असे. भंडाऱ्याच्या एका नामवंत शाळेने शाळेसाठी निधी उभारण्यासाठी अनुप जलोटाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाला तिकीट लावले. कार्यक्रम छान झाला. उत्पन्नही बऱ्यापैकी झाले. पण तिकीटाच्या पैशाचा झाला अपहार. अशी कुजबूज सुरू झाली. भंडाऱ्यात अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची स्थापना पण यांनीच केला होती. ग्राहक पंचायतीचीमुळे ओळखी खूप झाल्या होत्या. त्यातीलच काही सज्जन व्यक्तिंना हाताशी धरून हयांनी एक अस्थायी सत्यशोधन समिती स्थापन केली. त्या समितीमार्फत विकलेल्या प्रत्येक पावतीचा हिशेब घेतला व अपहार केलेले सर्व पैसे समितीने गोळा केले. ते सर्व पैसे शाळेच्या बँक खात्यात भरले. ते पैसे होते ३२००० रूपये. भंडाऱ्याला त्या काळात घरगुती गॅसची फारच टंचाई होती. त्यात वशीले बाजी. त्यामुळे ग्राहक पंचायतीमार्फत हयांनी तेथे मोठे आंदोलन केले होते. त्या मध्ये मी सुध्दा सक्रीय भाग घेतला होता. मला एक खात्री होती की हे जे काही काम करताहेत ते सामाजिक काम आहे, लोकांच्या हितासाठी आहे, अन्यायाविरूध्द आहे, भ्रष्टाचाराविरूध्द आहे त्यामुळे मी त्रागा जरूर करावयाची पण माझा सक्रीय भाग असायचाच.

न खाउंगा न खाने दुंगा या त्यांच्या वृत्तीमुळे एक फारच कठीण प्रसंग यांचेवर परभणी येथे शासकीय नोकरीत असतांना घडल्याचे मला आठवते. नुकतीच यांची नांदेडहून परभणीला बढतीवर बदली झाली होती. आता ते वर्ग १ चे अधिकारी होते. त्या घटनेची धग मला सुदध्दा बसली होती. घटना अशी घडली.

परभणी जिल्हयातल्या जिंतुर तालुक्यात एका गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई होती. दिवस मे महिन्याचे होते. प्रशासनाने तेथे दोन पाण्याचे टँकर दिले होते. सरपंचांची मागणी होती की आम्हाला ७ लाख रूपयाची तात्पुरती नळ योजना करून द्या. संबंधित इंजिनियरने सांगितले की त्या गावात पाणी पुरवठा योजना पूर्णत्वास आलेली आहे. विहिर तयार आहे. त्याला पाणी सुध्दा भरपूर आहे. हयांनी सुध्दा त्याला दुजोरा दिला. सरपंच म्हणाले त्या विहिरीला पाणी नाही. हे सगळे बोलणे मा. जिल्हाधिकाऱ्यांसमोरच होत होते. हयांनी म्हटले की सकाळी मी येतो व ते सगळे पाणी काढून घेउ व नंतर किती वेळात किती पाणी येते याचा अंदाज घेउ. गावाला रोज लागणारे पाणी दररोज त्या विहिरीपासून उपलब्ध झाले नाही तर ७ लाख रूपयाची तात्पुरती नळ योजना मंजूर करता येईल. सकाळी हे व हयांचे दोन सहकारी त्या गावात पोहचले. लक्षात असे आले की रात्रीच त्या विहिरीवरील विद्युत पंप व विद्युत खांब उखडून फेकले होते जेणेकरून रात्रीतून त्या विहिरीची किती आवक आहे याची तपासणी होउ नये. हयांनी तात्पुरत्या नळ योजनेला मुजूरी दिली नाही म्हणून सरपंचानी इतर गावकऱ्यांच्या मदतीने हयांना गाढवावर बसविले व हयांची गावातून मिरवणूक काढली. त्याही परिस्थितीत हयांनी नियोजित २ गावांचा दौरा केला. नंतर हे जिल्हाधिकारी कार्यालयात जावून जिल्हाधिकाऱ्यांना भेटले. त्यानंतर शासनाने संबंधितांवर योग्य ती कारवाई केली. या घटनेमुळे मला हयांचा जास्तच अभिमान वाटला.

पदव्युत्तर शिक्षणामध्ये त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये पाणी हा विषय होता. गावोगाव हातपंप करून गावकऱ्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हात्यांच्या नोकरीचा एक भाग होता. हातपंपांना चांगले पाणी लागायचे. यामुळेच त्यांना नोकरीत असतांनाच एक चिंता सतत भेडसावयाची की उद्या शेतकऱ्यांनी जर आपआपल्या शेतात बोअर केले तर भूगर्भातील पाणी संपून जाईल व पाणी टंचाई उदभवेल. भूजल पातळी खाली जाईल. सुरवातीची बरीच वर्षे ते या चिंतेत असायचे. येथेच पाण्याच्या कामाची ठिणगी पडली. मला आठवते १९९५ ला खोल गेलेली भूजल पातळी वर कशी आणायची यावर त्यांना उपाय सापडला. मोठ्या उत्साहात त्यांनी हा विचार संबंधित वरिष्ठांना सांगायचा प्रयत्न केला पण योग्य तो प्रतिसाद मिळाला नाहीष् नोकरीत असतांना त्यांना उपलब्ध झालेल्या अनुदानातून त्यांनी भूजल पातळी वर आणण्याबाबत काही प्रयोग केले. ते काम त्यावेळचे शिरपूरचे आमदार व शिक्षणमंत्री मा. अमरिषभाई पटेल यांनी पाहिले. त्यांना ते काम फारच आवडले. त्यांनी अवकाशप्राप्त झाल्याबरोबरच शिरपूरला नेले व सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या आणि शिरपूर पॅटर्नचा जन्म झाला. शिरपूरला आम्ही १४ वर्षे होतो. पतीच्या आवडत्या कामात कायम साथ द्यावयाची हे मी पूर्वीच ठरवले असल्यामुळे नातवंडांना खेळवण्याचा मोह दूर सारून मी शिरपूरला १४ वर्षे राहीली.

हे स्वभावाने अत्यंत तापट व स्पष्टवक्ते असल्यामुळे गेल्या ४८ वर्षात मला बराच त्रास झाला. एक बरे होते की हयांचा राग लवकर शांत व्हायचा. आपण रागावलो होतो हे सुध्दा ते पटकन विसरायचे. मुलांना देखील अभ्यासावरून रागावल्याचे कधी आठवत नाही. मुलांना त्यांनी 'तू हेच करायला पाहिजे' असा कधी आग्रह धरला नाही. त्यांनी आयुष्यभर कर्म हिच पूजा मानली. आपल्याकडे आलेल्या कामात निष्णात होण्याचा आटोकाट प्रयत्न करणे व ते काम अतिशय इमानदारीने करणे म्हणजेच देवपुजा करणे यावर त्यांचा ठाम विश्वास असायचा. त्यामुळे त्यांनी कधी सोवळे घालून देवपुजेला बसल्याचे मला आठवत नाही. स्वतःच्या व मुलांच्या लग्नात घातले असेल तेव्हढेच. पत्रिका, ज्योतिष्य वगैरे यावर यांचा विश्वास कधी नव्हताच.... आईचा विरोध झुगारून त्या काळात प्रेम विवाहही यशस्वी करून दाखविला....त्यांना मोजकेच व्यसने आहेत. प्रवासाचे,भरपूर फळे खाण्याचे, सुका मेवा खाण्याचे, वाचनाचे व लोकांशी चांगले बोलण्याचे. बाकी गोष्टींपासून म्हणजे मद्यपान व मांसाहारापासून ते दूरच राहीलेत.

प्रचंड इच्छाशक्ती, कष्ट करण्याची प्रचंड तयारी त्यामुळे त्यांनी जे जे ठरवले ते ते मिळवत गेले. आजारपण, थकवा हे विषय त्यांना कधी शिवलेच नाहीत. अभी तो मै जवान हु असेच ते म्हणतात. प्रचंड आदरातिथ्य असल्याने कोणीही परका समाधानाने तृप्त होउन परत येण्याची अपेक्षा ठेवायचा. सरकारी नोकरीत कसलाही डाग न लागता निवृत्त होणे हे फार मोठे यश आहे व ते त्यांनी ते मिळवले अहे. संघाचा स्वयंसेवक असुनही काँग्रेसच्या अमरिषभाईंचा विश्वास संपादन केल्याबद्दल एका अर्थाने त्यांनी संघाचे नांव मोठे केले आहे. लाथ मारीन तेथे पाणी काढीन हे आजवर त्यांनी प्रत्यक्ष सिध्द करून दाखविले आहे. मग लोकांनी त्यांना पाणदेव, आधुनिक भगिरथ म्हणणे यात वावगे ते काय?

कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वाढदिवस ते लक्षात ठेवत असत व प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीद्वारे त्यांना ते शुभेच्छा देत असत. सगळया नातेवाईक व मित्रपरिवार यांच्या वाढदिवशी त्यांना दूरध्वनी करून शुभेच्छा देणे हा त्यांचा आवडता छंद आहे. पैशासाठी लहानपणी त्यांना खूप संघर्ष करावा लागला पण आज आर्थिक सुबत्ता असूनही कसल्याही प्रकारची उधळपट्टी ते करत नाही. तरूणपणी नागपूरच्या ज्या गडकरी वाड्यात त्यांनी पेपर टाकले त्याच वाड्यातून आज त्यांना मानाने बोलावण्यात येते ही किती कौतुकाची बाब आहे. आज त्यांच्या कामाची दखल राष्ट्रीय पातळीवर घेतली आहे ही एक अभिमानाची बाब आहे. कंटाळा हा शब्द ते सहसा उच्चारत नाही. ते कधी म्हणत नाही की देवा माझे कसे होईल? ते नेहमी म्हणतात देवा तुझे कसे होईल.

हयांनी याच थोडक्या आयुष्यात ग्राहक पंचायतष् ब्राम्हण सभेचेही काम करून त्यांना एका उंचीवर नेले होते. पाकिटात न मावण्याइतके घामाचे पैसे त्यांच्याजवळ सदा असतात म्हणून त्यांनी आजवर कधीच पाकीट वापरले नाही तर ते नेहमी हँडबॅग वापरतात. त्यांची स्मरणशक्ति अफाट आहे तसेच चारही भाषांवर प्रभुत्व असल्यामुळे सहज बोलता बोलता ते मराठी, संस्कृत, इंग्रजी व हिंदी यातील उदाहरणे देत असतात तेंव्हा समोरचा माणूस अवाक् होतो. एक चांगला गुण म्हणजे त्यांच्या पोरांना एक ' बाप ' म्हणून त्यांची कधीच भिती वाटली नाही. आयुष्यात त्यांच सारं चांगलच झाले. त्यांनी उपकार, परोपकार हे ठरवून वा काही अपेक्षा ठेवून केले नाहीत. ज्यावेळी जे योग्य वाटेल ते ते करत गेले. आज त्याचा इतिहास निर्माण झाला आहे.

शिरपूरला हयांनी २००४ मध्ये पाण्याचे काम सुरू केले. मला आठवते २००८ च्या दरम्यान हयांचे नागपूरचे एक पत्रकार मित्र श्री प्रकाशराव एदलाबादकर शिरपूरला त्यांच्या मुलीकडे आले. त्यांनी शिरपूर पॅटर्नचे सर्व काम बघितले आणि हयांच्या कामावर एक प्रदीर्घ लेख लिहिला. लेखाचे शिर्षक होते 'खानदेशात राबणारा वैदर्भिय भगिरथ' हा लेख प्रथम जळगांच्या तरूण भारतात व नंतर नागपूरच्या तरूण भारतात प्रसिध्द झाला. हा आमच्या आयुष्यातील सर्वात महत्वाचा दिवस होता. हयांच्या कामाची ही पहिलीच प्रसिध्दी होती. या लेखानी यांना तर हिरोच केले. नंतर तर पुरस्कारांची भरच पडत गेली. अंबरनाथला तर एक आगळावेगळा पुरस्कार मिळाला. त्याचे नांव होते ' दधिची पुरस्कार' तेथे तर हयांना चौरंगावर बसविले व वेदमंत्रोच्चाराच्या गजरात प्रमुख पाहुणे मा.श्री अशोकरावजी कुकडे यांनी ५ मिनिटे पुष्पवृष्टी केली. या सत्काराची मी साक्षीदार होती. नंतर मुंबईला यु.आर.एल. फौंडेशन तर्फे हयांना १ लाखाचा कृतज्ञता पुरस्कार मिळाला. तसेच मुबईला वामनराव पै जीवनगौरव पुरस्कार मिळाला. दिल्लीला मा. शरद पवार साहेबांनी कृषि भवनात मंत्री समूहासमोर शिरपूर पॅटर्नवर भाषण करण्यास मुद्दाम मानाने पाचारण केले होते. मुंबईला विधान भवनाच्या केंद्रिय कक्षात मंत्रीमंडळासमोर व दोन्ही सभागृहाच्या सर्व आमदारांसमोर शिरपूर पॅटर्न संदर्भात ४० मिनिटे भाषण करण्यास मा. मुख्यमंत्री श्री पृथ्वीराज चव्हाणांनी पाचारण केले होते. आतापर्यंत २६ पुरस्कार हयांना मिळाले आहेत. असंख्य ठिकाणी भाषणाला हयांना बोलाविले गेले आहे. हयांच्या पाण्याच्या कामाची पोचपावतीच जणू मिळाली होती.

२०१२ ला जालना शहरात पाण्याचा प्रचंड दुष्काळ होता. त्या ठिकाणी कुंडलिका नदीवर ८ बंधारे बांधून जालना शहराचे टँकर कायमस्वरूपी बंद केले. नगर जिल्हयातील दुष्काळी तालुक्यातील १४ गावात शिरपूर पॅटर्नसारखे काम करून दुष्काळ हटविला. ठिकठिकाणचे टँकर बंद केल्याचे व शेतीला मुबलक पाणी उपलब्ध करून देण्याचे समाधान मी हयांच्या चेहऱ्यावर पाहत आले आहे. हयांच्या डोळ्यातील आनंदाश्रु मी सतत अनुभवले आहे. आज एका पेपर वाटून शिक्षण घेणाऱ्या मुलाला म्हणजेच हयांना इतके पुरस्कार व मानसन्मान मिळाल्याचे पाहून ते तर समाधानाने कृतकृत्य झालेच पण माझ्याही अंगावर मुठभर मांस चढलेच आणि म्हणूनच त्यांच्या समाधानी व कृतकृत्य जीवनाबद्दल म्हणावेसे वाटते की.

**आठवेल त्यांना इतिहास आज साऱ्या जिवनाचा**
**कर्तृत्वाचा पराकाष्ठेचा अन इमानदारीचा**
**सहचारीणीने दिलेल्या उत्तम सान्निध्याचा**
**यश , किर्ती, प्रेम अन कुटूंबातील एकोप्याचा**

माझ्या लग्नाला ४८ वर्षे पूर्ण होताहेत. या ४८ वर्षात आम्ही उभयतांनी मुलांसोबत हिंदुस्थान व हिंदुस्थानाबाहेर खूप प्रवास केला. हिंदुस्थानातील बहुतेक सर्व शहरे पाहिली. युरोपमधील १० देश, दुबई, लंका, मालदीव, अंदमान निकोबार, मलेशिया, थायलंड या देशांना भेट दिली. खूप मजा केली. सुखदु:खाचे खूप अनुभव गाठीशी आहेत. शेवटी सुख सुख म्हणजे नक्की काय असते ? प्रेमळ जोडीदार, गुणी मुले, जीव लावणाऱ्या सुना, उत्तम जावई. गोजिरवाणी नातवंडे हे सगळं मला भरभरून मिळाले म्हणूनच म्हणावेसे वाटते की,

**तृप्त मी ,संतुष्ट मी, अमुच्या या सहजीवनी**
**पती, मुले , सुना, नातवंडे यात रममाण मी**

*****



# एका दृष्टीक्षेपात शिरपूर पॅटर्न

१. किती गावांना लाभ झाला : ६६

२. किती शेतकऱ्यांना लाभ झाला : २,१८,४१९

३. किती बंधारे बांधले गेले : २३५

४. कामासाठी शेतकऱ्यांनी किती जमीन दान केली : ४,१०९५२ चौरस मीटर

५.नाल्यांचे केलेले खोदकाम : ६८,४९२ मीटर

६.किती पाणी अडवले गेले : १०५५५.७० टीसीएम

७.जमीनीत मुरलेले पाणी : २११११ टीसीएम

८. किती जास्तीची जमीन पाण्याखाली आली :१०,५५५ हेक्टर

९. शेतकऱ्यांचे वाढीव वार्षिक उत्पन्न : ९,४४० लाख रुपये

१०. झालेला एकूण खर्च : १८८ लाख रुपये

११. लाभः खर्च गुणक : ५०.२

१२. महाराष्ट्रात किती जिल्ह्यात शिरपूर पॅटर्नच्या धरतीवर काम चालू आहे : २१ जिल्हे

१३. महाराष्ट्राबाहेर किती राज्यात शिरपूर पॅटर्नच्या धरतीवर काम चालू आहे : ३ राज्ये

# पाणीदार माणूस

श्रीमती मीरा धाराशिवकर, धुळे

मो :



**निर्मितीचे एक नाते आहे पाण्याशी**
**कारण पाणीच आहे भविष्य उद्याच्या विश्वाचे**
**पाण्याशी ईमान सांगणारे युवकांचे तांडे**
**प्रेरणांच्या तरफांवर उद्याची क्षितीजे उजळीत**
**अन ओसपणाचे कोसच्या कोस तुडवीत**
**जेव्हा निघतील दहा दिशांनी**
**दऱ्याखोऱ्यातून आपले नि:श्वास -----**
**तेव्हा ती धरित्री होईल**
**सुजलाम सुफलाम मंगलदायिनी.....**

बाबा आमटे

वंदनिय बाबा आमटे यांच्या कवितेतले 'माती' ऐवजी 'पाणी' हा शब्द वापरला आहे. वरील कवितेतील युवकाप्रमाणे 'पाण्याचे भविष्य' घडवायला निघालेला युवा नेता आहेत 'सुरेश खानापूरकर'! युवा ! हो युवाच ! आज ते ७५ वर्षांचे होत आहेत. शरिराने, मनाने, वृत्तीने, तडफेने, जीद्दीने मात्र युवकच आहेत.

यांचा जन्म विदर्भातील मध्यमवर्गिय कुटुंबात झाला. वडील स्टेशन मास्तर. दरवर्षी बदली, अपिरिहार्यच. त्यांचे शिक्षण नागपूर जिल्ह्यातील काटोल, आकोट, वर्धा, चंद्रपूर, इ. गावात झाले. अभ्यासात कायम पहिला नंबर. घरात संघाचे संस्कार, अभ्यास, खेळ, वाचन, साऱ्या जगाकडे कुतुहलाने पहायची वृत्ती रक्तातच होती. कुठेतरी वाचनात आले, भारताला भूवैज्ञानिकांची गरज, त्यासाठी लागणारे शिक्षण घेतले की शासकीय नोकरी नक्की. मॅट्रिक नंतर शिकविण्याची वडलांची परिस्थिती नव्हती.

खानापूरकरांना ध्येय खुणावित होते, हातात मार्कशिट, वडलांनी दिलेले १५ रूपये आणि मनात जिद्द घेवून ते नागपूरला आले. महाविद्यालयाचे प्राचार्यही विद्यार्थीप्रेमी व गुणग्राही होते. त्यांचे मार्क, हुशारी आणि शिकण्याची जिद्द पाहून ते प्रभावित झाले. त्यांनी फी साठी सवलत दिली. स्कॉलरशिप दिली बाकी व इतर खर्चासाठी त्यांनी सकाळी लौकर उठून पेपर टाकायची लाईन पकडली, कुठेही ओळखदेख नसताना.

तिथेही तीनशे घरांपर्यंत मजल मारली. त्यासाठी रोज पंचवीस मैल सायकलिंग व्हायचे.

सकाळी पेपर टाकणे, मग जेवून कॉलेजला जाणे वगैरे अभ्यास व इतर छंद असे जगणे सुरू झाले. काळ पुढे जातच होता. ते फर्स्ट क्लासमध्ये Bsc झाले, Msc ला मात्र अप्लाईड जिऑलोजि ला स्कॉलरशिप असल्यामुळे तोच विषय घेतला. एम.एस.सी ची डिग्री हातात आल्यावर शासकीय नोकरीही मिळाली.

तेव्हा अशा भूवैज्ञानिकाची कमतरता होतीच. महाराष्ट्रात तर दुष्काळ आणि पाणी टंचाई पाचवीलाच पुजलेली. सरकारने जमिनीतील पाणी शोधून बोअरवेल द्वारे पाणी पुरविण्याचा प्रकल्प हाती घेतला. तेव्हा ही संकल्पना नवी होती. याच कामावर खानापूरकर रूजू झाले. त्यासाठी जनिमीचा सर्व्हे, पाणी शोधणे – त्याचे नियोजन वगैरे बऱ्याच गोष्टी होत्या. प्रत्येक गावात एक या प्रमाणे दोनशे गावात त्यांनी बोअरवेल केल्या. उपसा नसल्यामुळे पाणी लागेही.

जेव्हा लोकांना जमिनीत खाली खोलवर जाण्याचे तंत्र समजले तेव्हा लोक जमिनीच्या खालच्या थरापर्यंत जावून उपसा करू लागले. सरकारचे बोअर कोरडे पडू लागले. परंतु प्रत्येकाला तुम्ही थांबवू शकत नाही. हे कुठवर चालणार ? केव्हा ना केव्हा हे पाणी संपणार आहे आणि हाव वाढते आहे. असे हे दुष्टचक्र खानापूरकरांना या प्रश्नानी भंडावून सोडले. पाणी कसे वाचवता येईल ? गरज कशी पुरी करता येईल.... एकच भुंगा सतत घोळू लागला.

त्यासाठी प्रयत्न – प्रयोग, त्यात येणाऱ्या अडचणी १० वर्षे खानापूरकर त्यावर अभ्यास करीत होते. अनेक प्रश्न कसे निवारण करता येईल याची पडताळणी करीत होते. प्रत्यक्ष योजना डोक्यात तयार होत होती. अनेकांशी चर्चा प्रत्यक्ष भेटी यातून आराखडा झाला. बाकी सर्व शक्य होते पण पैसा तो कुठून आणणार ? त्यांनी आपला प्रोजेक्ट सरकार दरबारी सादर केले. तेथे नेहमीच उत्तर तुम्हाला हे उद्योग कुणी सांगितले आहेत. तुमचे तुमचे काम करा, ते संधीची वाट पहात राहिले.

निवृत्तीच्या आधी ते धुळ्याला आले.

येथे त्यांना छोटेसे हा होईना पण काम करण्याची संधी मिळाली. प्रयत्न यशस्वी झाले. इथे त्यांचा प्रयोग यशस्वी झाला. ते अनेकांना आपला प्रयोग आणि त्याची यशस्वीता दाखवू लागले. व धुळ्याजवळ एका गावाचा पाणीप्रश्न त्यांनी पुनर्भरणाने सोडवला. त्यांना त्यांच्या कामाचे महत्व जाणणारे अडचणी आल्यावर सोडविणारे इजि. मुकुंद धाराशिवकर, डॉ. देशकर यांच्या सारखे मित्र मिळाले. असेच एकदा शिरपूरचे आमदार मा. अमरिश भाई पटेल त्यांच्या ऑफिस मध्ये आले होते. यांनी बळेच आपल्या गाडीत बसवून काम पहायला नेले. सर्व आराखडा आपल्या वाणीतून उभा केला. कामाचे फलीत समोर दिसतच होते. जवाहिऱ्याने कलाकारीला बरोबर हेरले. निवृत्त झाल्यावर आपल्याकडे येण्यास सांगितले.

खानापूरकरांना अटी घालून पाहिल्या, भाईंनी सर्व अटी

मान्य केल्या. त्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिले. पैशाचा पुरवठा केला. कामात ढवळाढवळ केली नाही खानापूरकरांनीही मिळालेल्या संधी चे सोने केले.

त्यांनी शिरपूरचे नंदनवन केले. अनेक गावांचे टँकर बंद झाले. शेतकरी दुबार पिके घेवू लागले. जलाशयावर मासेमारी, बोटिंग सारखे उद्योग लोकांना मिळाले. नगदी पिकांमुळे लोकांमध्ये समृध्दी आली. कामासाठी शहरात गेलेले तरूणही मागे वळून परतु लागली. खानापूरकरांनी शिरपूरला प्रचंड हा शब्द अपुरा पडावा इतके काम केले आहे. त्यांनी काम केल्यावर पूर्ण भरलेले जलाशय आजही माझ्या नजरेसमोर आहेत.

एका माणसाचे एवढे काम तेही अगदी कमी पैशात. त्यांचे नागपूरचे मित्र एदलाबादकर काम पहावयास आले. आपल्या मित्राचे यश कर्तृत्व राहून भारावले. रात्रीच बसून त्यांनी 'खान्देशात राबणारा वैदर्भीय भगीरथ' नावाचा लेख तरूण भारत मधे लिहला. तोच पुढे लोकमत, जळगावमध्ये प्रसिध्द झाला. खानापूरकर एका रात्रीत हिरो झाले. त्यांचा शिरपूर पॅटर्न आणि ते यांनी मागे वळून पाहिलेच नाही.

आता वार्ताहारांचा, मान्यवरांचा ओघच शिरपूरला सुरू झाला. डॉ. माधवराव चितळे, यांच्या सारखे मान्यवर, राजकारणी, मंत्री, जलतज्ज्ञ, अनेकांनी प्रकल्पाला भेटी दिल्या.

पाण्याची गरज असणारे अनेक जण लांबून लांबून त्यांच्या भेटीला येवू लागले. मुलाखती, लेख आणणे त्यानिमित्ताने होणारे सत्कार यांनी ते आणखीनच कार्यमग्न झाले.

त्यांची झी चोवीस तास वरची मुलाखत विशेष गाजली, सततचे दौरे, मुलाखती, सत्कार यानी त्यांच्या कामाची ख्याती जगभर पसरली, मिस वर्ल्ड (साऊथ आफ्रिका), मिस युरोप (इंग्लंड) दोन दिवस शिरपूरला राहून काम पाहून गेल्या. खानापुरकरांनी शिरपूर पॅटर्न द्वारे खानदेशचे नाव जगाच्या नकाशावर कोरले.

२००४ ते २०१८ अशी चौदा वर्षे त्यांनी शिरपूरला काम केले. सुरूवातीला साठ विहीरीत पाणी टाकून बोअरवेल जीवंत केल्या. मग बंधाऱ्यांचे काम हातात घेतले. अडचणी होत्याच. तांत्रिक सल्लागार म्हणून मुकुंद धाराशिवकर सारखा जिवाभावाचा मित्र पाठीशी होता. चौदा वर्षात ६६ गावात २३५ बंधारे त्यांनी बांधले. एकूण ७० किलोमीटर लांबीचे बंधारे बांधले गेले. त्यात ३१६६७ घनमीटर एवढे पाणी साठले २५ हजार हेक्टर जमिनीला बारमाही पाणी मिळाले. सगळा भाग सुजलाम सुफलाम झाला. पाण्याच्या हिशेबाबदद्ल मी जास्त लिहिणार नाही. कारण जलसंवादने शिरपूर पॅटर्न व खानापूरकर विशेषांक पूर्वी काढले आहेत. त्यात कामाचा बारीक बारीक तपशील उपलब्ध आहे.



शिरपूरला भेट देणाऱ्यात अनेकजण होते – शेतकरी, सामान्य माणूस, ज्ञानवंत, कीर्तीवंत अगदी स्वामी नारायण मंदिराचे धर्मगुरू व मठाधिपती याला अपवाद नाहीत.

खानापूरकरांना सर्वात आनंद झाला तो सरसंघचालक मोहन भागवत शिरपूरला आले तेव्हा. सरसंघचालकांनाही सरकारी इतमाम डावलून त्यांच्या घरी राहिले.

अजि सोनियाचा दिनु इतका आनंद खानापूरकरांना झाला. जगाने कौतुक केले तरी आईच्या शाबासकीची महती वेगळीच, तसेच खानापूरकरांना झाले. सरसंघचालकाचा भव्य सत्कार शिरपूरला झाला. सर्वांसमोर मोहन यांनी आपला सत्कार खानापूरकरांना दिला.

खानापूरकर सर्वार्थाने धन्य धन्य झाले सारे भरून पावले अशी त्यांच्या मनाची अवस्था झाली. या प्रवासात त्यांना मिळालेली वहिनींची साथ वर्णन करायला माझ्या जवळ शब्द नाहीत. अशा तत्ववादी – तापट – स्पष्टवक्ता व आजच्या भाषेत वर्कोहोलिक माणसाला संभाळणे सोपे नाही. वहिनींनी हे कठीण व्रत आयुष्यभर अतिशय – सहजपणे हसतमुखाने संभाळले. त्यांचे समर्पण देवघरातल्या समईसारखे.

खानापूरकर आज ७५ वर्षांत पदार्पण करीत आहे. मित्रांनो मनाला ध्येयासा वय नसते ते असेच ताजेतवाने उस्ताही कार्यमग्न राहोत. कारण हीच त्यांची ऊर्जा आहे – त्यांचे अभिष्ट चिंतन करून त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी परमेश्वर चरणी प्रार्थना !!!!

*****

# हेची फल काय मम तपाला?

**डॉ. दत्ता देशकर**

**मो : ९३२५२०३१०९**



या कथेचा नायक आहे एक सरकारी अधिकारी. ही कथा आहे टाकळी कुंभकर्ण गावाची. हे गाव परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील. हा अधिकारी भूजल सर्वेक्षण खात्यातला. एक दिवस जिल्हाधिकारी कार्यालयात एक महत्वाची सभा होती. सभेत जिल्ह्यातील सर्व महत्वाचे अधिकारी उपस्थित होते. मिटिंगला हा अधिकारी उशीरा आलेला. संपूर्ण आंग चिखलाने बरबटलेले. तोंडाला काळा रंग फासलेला. याची एंट्री झाल्याबरोबर सर्वजण अवाक होवून त्याचेकडे बघायला लागले. अर्थातच जिल्हाधिकारी साहेब खूप संतापले. अशा रुपात तुम्ही सभेत कसे काय येवू शकता हा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. बैठकीची सर्व जबाबदारी श्री. चंद्रकात या अप्पर जिल्हा दंडाधिकारी यांची. ते या माणसाला चांगलेच ओळखत होते. जिल्हाधिका–यांची परवानगी घेवून ते यांना अँटी चेंबरमध्ये घेवून आले. आणि त्यांच्या पाठावर हात फिरवत त्यांना विचारते झाले, ही अशी तुमची अवस्था कोणी केली ?

हा अधिकारी मूळातच प्रामाणिक, कणखर, हजर जबाबी म्हणून जिल्ह्यात प्रसिद्ध होता. त्याची अशी अवस्था कोणी केली हा प्रश्न चंद्रकांत यांना पडला. चंद्रकांत यांनी प्रश्न विचारल्यावर एवढ्या कणखर अधिका–यालाही भावना आवरता आली नाही आणि तो हमसून हमसून रडायला लागला. आणि त्याने घडलेली घटना कथन करायला सुरवात केली.

टाकळी कुंभकर्ण या गावाचे सरपंच एक दिवस जिल्हाधिकारी साहेबाला भेटायला आहे आणि त्यांचे गावातील पाणी प्रश्न सोडविण्याची मागणी केली. त्यांनी त्यासाठी एक योजनाही आणली होती आणि ती मंजूर करावी अशी ते विनंती करीत होते. दूर अंतरावरुन पाइपलाईन टाकून पाणी आणले जावे अशी ती योजना होती. त्या योजनेला सात लाखाचे वर खर्च अपेक्षित होता. आपल्या कथा नायकांने त्याला विरोध केला आणि त्या गावात अशी एक विहीर आहे जिचे पाणी या गावाला पूरेसे आहे असा त्याचा दावा होता. दररोज १ लाख लिटरपेक्षा जास्त पाणी रोज त्या विहीरीला येत होते व तेवढ्या पाण्याने गावाची गरज भागेल असा त्यांचा दावा होता. सरपंचाने या वक्तव्याला तीव्र विरोध केला आणि त्या विहीरीची तेवढी क्षमता नाही असा प्रतिवाद केला. आपले कथानायक त्यांना म्हणले, उद्या सकाळी मी तिथे येतो, आपण पंप लावून सर्व विहीर रिकामी करु आणि नवीव किती पाणी येते याचा अभ्यास करु. जिल्हाधिकाऱ्यांना ही कल्पना मान्य झाली व दुसऱ्या दिवशी त्या गावाला भेट देण्याचे ठरविण्यात आले.

संरपंचसाहेब आवश्यकतेपेक्षा जास्त शहाणे होते. रातोरात त्यांनी त्या विहीरीवरील मोटर काढून टाकली आणि विजेचे खांब उखडून फेकून दिले. अझिकारी जेव्हा तिथे भेटायला गेले तेव्हा त्यांना खरी परिस्थिती लक्षात आली. खोटेपणा लक्षात आला. यांनी ती योजना मंजूर करायला साक्षात नकार दिला. सरपंचाना खूप राग आला आणि त्यांनी गावकऱ्यांना एक गाढव आणायला सांगितले आणि या अधिकाऱ्याच्या कपड्यांना व तोंडाला डांबर फासून गावात त्यांची गाढवावरुन गावात धींड काढण्यात आली. केकमी म्हणून की काय तर गळ्यात चपलांची एक माळही घालण्यात आली. हा प्रकार संपल्यानंतर तिथून ते अधिकारी सरळ जिल्हाधिकाऱ्यांचा कार्यालयात आले होते आणि जिल्हाधिकाऱ्याच्या रागाला कारणीभूत ठरले होते.

मिटींग संपल्यानंतर चंद्रकांत यांनी झालेला प्रकार जिल्हाधिकारी आणि एस.पी. साहेबांना कथन केला. संरपंच साहेब त्या विहीरीचे पाणी स्वतःच्या शेतातील उसासाठी वापरत होते . त्यामुळे या पाण्यावर गावाचा हक्क येवू नये अशी त्यांची इच्छा होती. आता जिल्हाधिकारी पुन्हा चिडले पण ते या अधिकाऱ्यावर नाही तर संरपंचावर. त्यांनी एस.पी साहेबांना आदेश दिला. त्या सरपंचाला आणि जे गावातील लोक या प्रसंगासाठी प्रत्यक्षपणे आणि अप्रत्याक्षपणे जबाबदार असतील त्यांना तोबडतोब अटक करा आणि विरोध केला तर लाठीमार करुन ती कार्यवाही पूर्ण करा असा आदेश देण्यात आला. एस.पी. साहेबांनी पोलिसांचा मोठा फौजफाटा पाठवून सर्वांना अटक केली. जिथे विरोध झाला तिथे आवश्यक तो लाठीमारही केला.

ही बातमी गावातील विविध वर्तमान पत्रांच्या प्रतिनिधींनाही कळली व तो सर्व जास्त माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात येवून धडकले. चंद्रकांत साहेबांना याची अपेक्षा होतीच त्यांनी एक सविस्तर नोट टाइप करुन ठेवली होती. तिच्या प्रती वर्तमान पत्रांच्या वार्ताहारांना वाटण्यात आल्या. वर्तमान पत्राच्या बातमीदारांना खरी परिस्थिती लक्षात आली आणि त्यामुळे प्रकरणाचा जास्त गाजावाजा झाला नाही.

हे भूजल खात्याचे अधिकारी कोण हा आपल्याला प्रश्न पडला असेल. ते होते श्री. सुरेश खानापूरकर. ज्येष्ठ भू वैज्ञानिक. महाराष्ट्र राज्य. आधीच प्रामाणिक अधिकाऱ्यांची वानवा. आणि त्या असा अनुभव आल्यावर सरकारी यंत्रणा हतबल झाली नाही तरच नवल. खानापूरकर स्वतःला विचारते झाले, हेची फल काय मम तपाला ?

*****

# खान्देशात राबणारा वैदर्भीय भगीरथ

**श्री. प्रकाश एदलाबादकर**

**मो : ९८२२२२२११५**



'ही अरूणावती नदी आहे ना, ती मला बारमाही वाहती करायची आहे, पावसाच्या पाण्याचा थेंब अन् थेंब आणि धरणातून वाया जाणारं पाणी उपयोगात आणून सगळे नाले बारमाही वाहते करायचे आहेत. पन्नास फुटावर पाणी लागले पाहिजे ' सुरेश खानापूरकर आत्मविश्वासाने सांगत होते.

आमची टाटा सुमो अरूणावती नदीच्या पुलावरून चालली होती. खाली नदीचे कोरडे ठणठणीत विस्तीर्ण रेताड पात्र, भर फेब्रुवारीतही नदी कोरडी. मुंबई – आग्रा महामार्गावरील आत शिरून आम्ही शिरपूर गावात शिरत होतो. सुरेशने शिरपूर तालुक्यात सुरू केलेल जलपुनर्भरणाचे प्रयोग बघत दिवसभर हिंडलो होतो. आपादमस्तक धुळीने माखून गेलो होतो.....

शिरपूर हे सातपुड्याच्या कुशीत वसलेले, मुंबई – आग्रा महामार्गावरचे एक रमणीय टुमदार गाव. धुळे जिल्ह्यातील व्यापारी केंद्र असलेल्या या गावात जाण्याचा ५ – ६ वर्षात ८ – १० वेळा जाण्याचा योग आला. कारण मुलीचे घर या गावात. दुष्काळी जिल्हा म्हणून अख्ख्या महाराष्ट्राला परिचित असलेल्या धुळे जिल्ह्यातील शिरपूरात चोवीस तास नळाला पाणी, पाण्यासाठी वणवण नाही की टँकर भोवती जमाव नाही, भर उन्हाळ्यातसुध्दा, आणि आता सुरेशच्या कल्पक प्रयत्नांमुळे शिरपूर तालुक्यातील गरीब शेतकरीसुध्दा समाधानी आहे.

महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री, आमदार अमरिशभाई पटेल यांचा हा मतदारसंघ आणि कार्यक्षेत्र. त्यांनीच सुरेशला शिरपूरला आणले आणि त्याच्या क्रियाशील कल्पकतेला आपल्या कार्याचा भक्कम आधार दिला. एका नव्या स्वप्नाला, वास्तवात आणण्याची ही सुरूवात होती.

शासनाच्या भूजल विभागातून निवृत्त झालेले सुरेश खानापूरकर हे नागपूर विद्यापीठातून भूगर्भशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षण घेतलेले कार्यक्षम अधिकारी म्हणून सर्वदूर परिचित. जलपुनर्भरणासाठी धुळे जिल्ह्यात केलेल्या एका कामाच्या उद्घघाटनासाठी अमरीशभाई आले होते. सुरेशचे काम बघून प्रभावित झाले. एक सरकारी अधिकारी इतके निर्दोष आणि उत्कृष्ट काम करू शकतो यावर त्यांचा विश्वासच बसेना ! सुरेशच्या सेवानिवृत्तीला केवळ सहा महिने शिल्लक होते. सेवानिवृत्तीनंतर अमरीशभाईंनी केलेल्या विनंतीला मान देवून सुरेश शिरपूरला आला आणि आपल्या कल्पना अंमलात आणायला त्याने सुरूवात केली.

धुळे, जळगाव, नंदूरबार या जिल्ह्यात तापी नदीच्या गाळाचा भाग आढळतो. तर अकोला, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यात पूर्णा नदीच्या गाळात भाग आढळतो. सुरेश खानापूरकर सांगत होते.

या भागात पाणी मुरण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. पिवळ्या मातीचा थर फार मोठ्या प्रमाणात पाणी झिरपू देत नाही. या गाळाच्या भागात वाळूचे थर आहेत. पिवळी माती व वाळू यांचे थर आलटून पालटून आहेत. वाळूच्या थरात तीस टक्के पाणी मुरू शकते. थोडेथोडे



पाणी साचून हे वाळूचे थर संपृक्त झाले होते. १९७२ साली विजेचे पंप आल्यावर पाण्याचा उपसा वाढला. १९८५ पर्यंत या भागातील साध्या विहीरी ज्यांची खोली १०० फूट होती, त्या आटल्यानंतर लोकांनी पूपनलिका खोदल्या. त्यांचीही खोली ८०० फुटांपर्यंत गेली, पण पाणी नाही. नैसर्गिकरितीने पाण्याचे पुनर्भरण होण्याचा वेग अतिशय मंद आणि भूजलाचा उपसा मात्र प्रचंड वेगाने झाला. त्यामुळे आता कृत्रिम भूजल पुनर्भरण केल्याशिवाय पर्याय नाही. माझ्या कामाचा हाच मूळ उद्देश आहे.

पण हे कसे शक्य आहे. जमिनीच्या पोटात पुन्हा पाणी भरायचे म्हणजे उलटी गंगा वाहण्यासारखेच शिवाय खर्च प्रचंड येणार, त्याचे काय ? खोदकाम सुरू असलेल्या एका नैसर्गिक नाल्याच्या काठावर बसून भोवतालची हिरवीगार शेते न्याहाळत मी विचारले.

पावसाचे पाणी अथवा धरण भरल्यावर वाया जाणारे पाणी शुध्द करून, गाळून ते पाणी जर या भागातील कोरड्या विहीरीत वरून टाकले तर त्यातून पाण्याची पातळी वाढू शकते, हे धुळे जिल्ह्यात मी सप्रयोग सिध्द केले आहे, सुरेश आपला प्रयोगानुभव सांगू लागला. या कोरड्या विहीरीजवळ १० फूट लांबी रूंदी खोलीचे दोन टाके बांधावे, पहिले टाके रिकामे ठेवावे, दुसऱ्या टाक्यात मध्यम आकाराचे गोल दगड, नंतर जाड रेती व शेवटी बारीक रेती असे थर द्यावे. नाल्यातील पाणी पहिल्या टाक्यात जाईल. तिथे त्यातला गाळ खाली बसेल, तिथून दुसऱ्या टाक्यात गेल्यावर तिथे फिल्टर होईल आणि टाक्याच्या तळाशी असलेल्या पाईपमधून विहीरीत जाईस.

शिरपूर तालुक्यात गेली तीन वर्षे हे काम सुरू आहे. शेतीमधील कोरड्या विहीरी पुन्हा बांधून काढल्या आहेत. शेतजमिनीच्या लगत असलेले नैसर्गिक नाले नव्याने खोदून काढले आहेत. साठ हजार लिटर प्रतितास या वेगाने या विहीरींमध्ये पाणी जाते आहे. पण विहीरी भरल्या नाहीत, इतकी भूजल पातळी खाली गेली आहे. शिरपूरचे आमदार अमरीशभाई पटेल यांनी सुरेश खानापूरकरांवर ही जलपुनर्भरण प्रकल्पाची जबाबदारी सोपवली. त्यांच्या प्रियदर्शिनी सहकारी सूत गिरणीने भक्कम आर्थिक पाठिंबा दिला आहे. अमरीशभाईंनी सुरेशच्या दिमतीला डंपर्स, ट्रक्स, खोदकामाची अत्याधुनिक अवजड यंत्रसामग्री आणि भरपूर मनुष्यबळ दिले आहे. दरवर्षाला दोन करोड रूपये या कामाला खर्च होतात. सरकारचा एक तांबडा पैसाही या कामात खर्च झाला नाही, होणार नाही. जबर राजकीय इच्छाशक्ती, आर्थिक पाठबळ, मतदारसंघातील सामान्य माणसाच्या विकासाची तळमळ आणि नेमकी गुणी माणसे हेरून त्यांना सन्मानपूर्वक कार्यरत ठेवणे या सर्वांचा समुच्चय असला तर सृजनात्मक विकास कसा होतो, याचे प्रयदर्शिनी पाणलोट क्षेत्र विकास कार्य हे स्पृहणीय, अनुकरणीय आणि अभिमानास्पद उदाहरण आहे.

या तंत्राधारित जलसंधारणाचे सुरेशने पाच टप्पे ठोकळमानाने सांगितले. ओढ्यांना बारमाही वाहते करण्याच्या तंत्राबद्दल सुरेश सांगत होता, या शिवाय विहीरींना बारमाही पाणी राहणार नाही. उगमापासून ते संगमापर्यंत सर्व लहान लहान नाले ४० फूट रूंद अंदाजे ३० फूट खोल करावे लागतात. दर ३०० ते ४०० मीटरवर बिना दरवाजाचे बंधारे तयार करावे लागतात. एकाच नाल्यावर साखळी पध्दतीने बंधारे बांधल्यामुळे गाळ येण्याचे प्रमाण कमी रहाते. ५ ते ६ लाखात उत्तम बंधारा तयार होतो. सरकारप्रणित कोल्हापुरी बंधाऱ्याच्या बांधकामात बरेच घोटाळे झाले आहेत.

सरकारी भ्रष्टाचाराचे पाणी कुठे मुरते, हे सर्वांना ठाऊक आहे. पण, तुमच्या या जलसंधारणात जमिनीत पाणी कसे मुरते ? माझी शंका !

‘नाला खोल करताना काही वेळा कडक झालेला नालातळ सुरूंगाद्वारे काढून पाणी जिरवणारा मुरूम उघडा पाडणे अत्यंत गरजेचे असते. हा कडक नाला दोन्ही बाजूंच्या विहीरी व विंधन विहीरींची पातळी लक्षणीय स्वरूपात वाढवतो. बायपास सर्जरीमध्ये जसे सर्जन अडथळारूपी गाठ सर्जरी करून कापून टाकतो त्याचप्रमाणे नाल्यामध्ये अच्छिद्रस्तर असेल तर तो बाजूला करणे व पाणी मुरायचा मार्ग मोकळा करणे गरजेचे आहे. यालाच मी तंत्राधारित जलसंधारणातील बायपास सर्जरी म्हणतो. ’

हे सर्व करताना शासकीय वनजमिनीवर पडलेला पाऊस अडवला पाहिजे. जमिनीतील पाण्याची पातळी वाढवायला तो जिरवला पाहिजे. शासकीय धोरण याला अनुकूल करायची गरज आहे. प्रत्येक नदीच्या पाणलोट व लघुपाणलोट क्षेत्रातील प्रत्येक नाल्यावर बंधारे घालायला हवे. त्यासाठी वनकायद्यात दुरूस्ती केली पाहिजे. पक्षीय राजकारणाच्या सीमा ओलांडून हे झाले पाहिजे. सुरेश तळमळीने सांगत होता त्याची तळमख कामातून आणि अनुभवातून आलेली आहे.

ही जलसंधारण योजना शासनाला जर प्रामाणिकपणाने अंमलात आणायची असेल तर रोजगार हमी योजनेशी तिची सांगड अजिबात घालू नये. असे सुरेशचे स्पष्ट मत आहे. त्या योजनेचा परिणाम असा झाला की, दुष्काळ पडेल तेव्हा वा मजूर मिळतील तेव्हा जलसंधारणाची कामे होतात. उल्लेख करावा असे एकही पाणलोट क्षेत्र राज्यात विकसित झाले नाही. अशी खंत व्यक्त करीत सुरेश म्हणाले, ‘ त्यासाठी तळमळ हवी. मजूर मस्टर यात अडकू नका, रोहयोच्या माध्यमातून अडीच हजार कोटी रूपयांचा कर मिळतो. पाण्याची तशी कमतरता नाही. फक्त उत्तम नियोजनाचा दुष्काळ आहे. पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामाकडे अक्षम्य व गंभीर दुर्लक्ष होत आहे. हे असेच जर चालत राहिले तर राज्यातील ८० टक्के वाहिती योग्य जमिनीला दुबार अनुदानाच्या मलमपट्टीने ही समस्या सुटणार नाही.’

विहीरींच्या पुनर्भरणाचे हे काम गेली तीन वर्षे शिरपूर तालुक्यात सुरू आहे. अजनाड, असली, भाटपुरा या गावातील कामे प्रत्यक्ष बघितल्यावर याचे मोल लक्षात येते. आजतागायत २९ दगडी बंधारे, ३ शेततळे, ५४ विहीरी जवळपास ३० ते ४० कि.मी लांबीच्या नाल्यांना रूंद करून २० बंधारे असे १६ गावात काम पूर्ण केले असून संपूर्ण तालुक्यातील १४९ गावात काम पूर्ण होणार आहे. आज तीन वर्षांनी परिणाम असा झाला की, २८० ते ३०० फूट खोल असलेले पाणी १०० फुटांवर आले आहे.

माझ्यासारख्या शहरी माणसाला कास्तकारांच्या समस्यांची फार वरवरची माहिती असते. पण प्रत्यक्ष काम करणाऱ्या माणसाला याची तळमळ असते. सुरेश खानापूरकर हा तळमळ असलेला माणूस प्रथम आहे, मग नंतर भूजल वैज्ञानिक आणि निवृत्त अधिकारी वगैरे. त्याच्यासारखे राबणारे अधिकारी आणि त्याच्या पाठीशी पहाडासारखे उभे राहणारे राजकारणी अशा पन्नास जरी जोड्या महाराष्ट्रात उभ्या

झाल्या तर अवघा प्रदेश सुजलाम्  सुफलाम्  होईल. सुरेश खानापूरकर बद्दल खूप ऐकून होतो, पण एक संपूर्ण दिवस त्याच्यासोबत फिरल्यावर त्याने उभे केलेले काम, थोडेतरी समजले.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या, त्यांची दयनीय अवस्था यावर कंठरवाने बोलणारे, त्याचे राजकारण करून आपली पोळी भाजून घेणारे अनेकजण आहेत. स्तव:च्या प्रयोगशीलतेने खान्देशच्या शेतकऱ्यांना 'पाणदेव' झाला आहे. आपल्या माणसाचे कामाचे मोल परक्याने केले म्हणजेच आपल्याला कळणार, हे दुर्दैव आणि हा करंटेपणा आतातरी थांबला पाहिजे.

सुरेश खानापूरकरांसारख्या माणसांचा गुणग्रहक बुध्दीने आणि सकारात्मक पध्दतीने शोध घेतला तर अनेक योजना प्रत्यक्षात आणता येतात, सरकारी मदतीशिवाय, हे सिध्द झाले आहे.

( सदर लेख श्री. एदलाबादकर यांनी हे काम पाहिल्याबरोबर लिहिला आणि नागपूरच्या तरूणभारत दैनिकात प्रकाशित केला. श्री. खानापूरकर यांचे कामावर लिहिण्यात आलेला हा पहिलाच लेख होय.)

*****







# पुण्यश्लोक श्री. सुरेश खानापूरकर - अविश्रांत ७५

**डॉ. दत्ता देशकर - मो : ९३२५२०३१०९**



आज मी पदवीदान समारंभ करणार आहे. जलसंवाद मासिकातर्फे श्री. सुरेश खानापूरकर यांना पुण्यश्लोक ही पदवी बहाल करणार आहे. जलक्षेत्रात अनमोल कार्य केल्याबद्दल अहिल्याबाई होळकर यांना पुण्यश्लोक ही पदवी देण्यात आली होती. खानापूरकर यांचेही कार्य त्याच तोडीचे असल्यामुळे त्यांना ही पदवी शोभून दिसेल. खानापूरकर साहेब, वयाची ७५ वर्षे आपण जलक्षेत्रात अनमोल असे कार्य करीत पूर्ण केलीत या बद्दल आपले हार्दिक अभिनंदन आणि उर्वरित आयुष्य सुखाचे, समाधानाचे आणि भरभराटीचे जावो ही शुभेच्छा.

आज प्रत्येक कार्यकर्त्याला स्वतःला जलतज्ज्ञ म्हणवून घेण्याची घाई झालेली दिसते. दोन चार नाले खोदले, त्यात पाणी जमा झाले म्हणजे मी त्या विषयात तज्ज्ञ झालो असे समजणारे महाभाग अनेक आहेत. पावसाळा संपला आणि नंतर ते नाले कोरडे पडले याची खंत त्यांना नसते. सिनेनट अमिरखान च्या पानी फाउंडेशन कडून पुरस्कार मिळालेल्या गावांची आपण पाहाणी केली तर काय परिस्थिती आहे याचा अभ्यास केला जावा असे माझे प्रामाणिक मत आहे. मी त्याच्या कामाला मुळीच कमी लेखत नाही. त्याने जनजागृती मोठ्या प्रमाणावर केलेली आहे त्याला तोड नाही. पण त्या कामामुळे एखाद्या वर्षीचा पाणी प्रश्न सुटला म्हणजे काम फत्ते झाले असे मात्र समजले जावू नये असे मला वाटते.

गेल्या अनेक वर्षात पाणी प्रश्न सोडविण्यासाठी कमी प्रयत्न झालेत का? पण यश काय तर शून्य. हे मान्य की लोकसंख्या वाढत आहे, प्रत्येक माणसाची पाण्याची गरज वाढत आहे पण जलसाठवण त्या प्रमाणात कां वाढवली जात नाही ? ही जलसाठवण वाढविण्यासाठी कोणत्या प्रयत्नांची गरज आहे? की हा प्रश्न सुटूच शकत नाही? याला कोणी उत्तर शोधू शकणार नाही का? अशी कोणी व्यक्ती आहे का की जी हमखास पणे याचे उत्तर शोधून काढू शकेल? अशी एक व्यक्ती माझ्या पाहण्यात आली की जी म्हणते की माझेजवळ या प्रश्नाचे उत्तर आहे. आणि ती व्यक्ती आहे पुण्य श्लोक श्री. सुरेश खानापूरकर. त्यांचे बोलण्यात जो विश्वास दिसतो तो वाखाणण्यासारखा आहे. त्यांनी सरकारला ऑफर दिली होती. मला १० कोटी द्या, मी जालन्याचा पाणी प्रश्न कायमचा सोडवून दाखवतो आणि तो सुटला नाही तर पैसे परत करण्याची मी हमी देतो. अशी हमी तीच व्यक्ती देवू शकते जिला खात्री आहे की मी काम निश्चितपणे करु शकेन.

खानापूरकरांची व माझी घसट वाढली ती आमच्या गुजराथच्या दौऱ्यात. एक दिवस मी वर्तमानपत्रात बातमी वाचली की गुजराथने पाणी प्रश्नावर मात केली. मला आश्चर्य वाटले. महाराष्ट्रापेक्षा कमी पाऊस पडत असून सुद्धा असे कसे घडले हा प्रश्न मला पडला. मी खानापूरकरांना फोन केला व असे कसे घडले याची विचारणा केली. ते म्हणाले, देशकर, आपण तिथे जावून प्रत्यक्ष पाहणीच करु या. सोबत जलक्षेत्रातील तळमळीचे कार्यकर्ते श्री. अभिजित घोरपडे यांनाही घेतले. आम्ही तिघांनी मिळून गुजराथमधील वेगवेगया जिल्ह्यातील किमान दहा ते पंधरा खेड्यांना भेट दिली. तिथल्या ग्रामस्थांशी चर्चा केली आणि आम्हाला उत्तर मिळाले. तिथे आम्ही काय बघितले हो.

१. सर्व गावकरी आपली जात, धर्म, आर्थिक स्थिती विसरुन एकत्र आले.
२. त्यांनी गावातील सर्व नाले हुडकून काढले.
३. त्या नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण केले.
४. माथा ते पायथा ठराविक अंतरावर चेकडॅम बांधले.
५. या साठी गाव वर्गणी जमा केली.
६. ज्यांची वर्गणी देण्याची क्षमता नव्हती त्यांचेकडून शारीरिक काम करुन घेतले.
७. यासाठी तांत्रिक मदत व यांत्रिक मदत सौराष्ट्र जलधारा ट्रस्ट या सेवाभावी संस्थेने केली.
८. या ट्रस्टने सिमेंट कंपन्या आणि सळया पुरविणाऱ्या कंपन्यांकडून कमी दरात सिमेंट व सळया मिळवून दिल्या.
९. काही वर्षातच साडेचार लाखांचे वर चेकडॅम बांधण्यात आले.
१०. आज शेतकऱ्यांना १२ महिने पाणी मिळत आहे.

आमचे त्यांनी केलेले आगत स्वागत पाहून आम्ही भारावून गेलो. परतीच्या प्रवासात मी खानापूरकरांना एक प्रश्न विचारला, तुम्ही हे काम पाहून समाधानी आहात का? ते उत्तरले, काम चांगले झाले आहे, फक्त टिकावू लाभ मिळण्यासाठी खोलीकरण वाढवायला हवे होते. आणि नेमकी हीच गोष्ट त्यांनी आपल्या शिरपूरच्या कामात केली. काही ठिकाणी तर त्यांनी केलेले खोलीकरण ५० फूटांपेक्षाही जास्त होते. जेव्हा जलसाठे वाढतात तेव्हा स्वतःचा दाब व वरील हवेचा दाब जमिनीत पाणी मुरवण्यासाठी कारणीभूत ठरतात असे त्यांचे मत दिसले. शिरपूर परिसर हा खाचदरीचा प्रदेश आहे. कधीकाळी येथे भूस्खलन होवून कालांतराने तिथे गाळ जमून जमीन तयार झाली असल्यामुळे तिथे पाणी मुरण्याचे प्रमाण जास्त असते. तुमची बहुतांश कामे या प्रदेशामधील आहेत आणि त्यामुळे तुम्ही यशस्वी ठरला आहात असे तुमचे टीकाकार म्हणतात असे म्हणताच ते हासायला लागले. उत्तरात ते म्हणाले, देशकर, या टीकेत तथ्य नाही. कारण माझी बहुतांश कामे ही



लाव्हा रसाने बनलेल्या जमिनीत झाली आहेत आणि तिथेही मला तितकेच यश मिळाले आहे. माझे टीकाकारांना म्हणणे आहे की त्यांनी घरी बसून माझेवर टीका करु नये. इथे यावे, पाहाणी करावी आणि मग टीका करावी.

लाव्हा रसाने तायर झालेल्या जमिनीत पाणी कमी मुरते ही वास्तविकता नाकारता येवू शकत नाही. पण त्यालाही मी उत्तर शोधून काढले आहे. लाव्हा रसाने बनलेल्या जमिनीचा मी अभ्यास केला तेव्हा असे लक्षात आले की हा थर एकदम तयार झालेला नाही. २५-३० फूटांचा एक थर आला. ते स्थिर झाला. उन्हामुळे व पावसाच्या माऱ्याने त्याची झीज सुरु झाली. आणि काही वर्षांनंतर दुसरा थर आला. असे विविध थर आपल्याला आलेले दिसतात. पण पहिल्या थरावरची जमीन खडक विदीर्ण झाल्यामुळे मऊ झाली होती व तिच्यावर हा नवीन थर आल्यामुळे दोन थरांमध्ये मऊ थर अस्तित्वात आहेत व ती पाणी मुरण्यासाठी आदर्श जागा आहे. वरचा थर हा पाणी खाली जावू देत नाही. त्यामुळे त्याला फोडल्याशिवाय पाणी खाली जाणार नाही. याला ते अँजिओप्लास्टीचे उदाहरण देतात. रक्ताभिसरण सुरळीत व्हावे म्हणून वैद्यकीय शास्त्रात जशी अँजिओप्लास्टी केली जाते तशी येथे केली तर पाणी खाली उतरुन जमिनीत जलसाठे वाढविले जावू शकतात. मी हायड्रोजिऑलॉजिस्ट आहे. पाणी आणि खडक यांचा मी अभ्यासक आहे. त्यामुळे माझेवर ज्यांना याचे ज्ञान नाही अशांनी टीका केली तर मला त्यात काही स्वारस्य वाटत नाही.

मी पावसाचाही अभ्यासक आहे. महाराष्ट्रात जो पाऊस पडतो त्याची एक सायकल आहे. एक हंगाम चांगला व नंतरचे दोन हंगाम वाईट अशा पद्धतीने पाऊस पडतो. त्यामुळे या दोन चांगल्या हंगामांतील पाण्याची एकमेकाशी भेट घडवण्यात जर आपण यशस्वी ठरलो तर पाणी समस्या निर्माणच होवू शकणार नाही असा माझा दावा आहे. त्यामुळे इतके पाणी जमवून ठेवा की पुन्हा चांगला हंगाम येईस्तवर आधीच्या हंगामाचे पाणी पुरले पाहिजे. या साठी ते गृहिणीचे उदाहरण देतात. नगरपालिकेने दोन दिवस पाणी येणार नाही असा फतवा काढल्याबरोबर गृहिणी काय करते हो ? ती घरात इतका जलसाठा करुन ठेवते की ज्यामुळे घरी पाण्याची तूट जाणवत नाही. जे त्या गृहिणीला समजते ते आपल्या सरकारला व जलतज्ज्ञांना का समजू नये असा प्रतिसवाल ते विचारतात.

माझ्या अभ्सासावर आधारित महाराष्ट्रात किमान २० जिल्ह्यात जलसंधारणाचे काम काही स्वयंसेवी संस्था करीत आहेत. तेथील अभ्यासक सिरपूरला आलेत, माझे काम समजावून घेतले आणि नंतर आपल्या गावात जावून तिथे हे काम केले. अडचण आली तर मला मदतीला बोलावले. मलाही य़ा कामात रस असल्यामुळे मी कोणतेही आमंत्रण नाकारत नाही व तत्परतेने तिथे जावून मदतीचा हात पुढे करतो. बरेचदा जेव्हा प्रयोग यशस्वी होतो तेव्हा जलपूजनाच्या कार्यक्रमाला ते मला अगत्याने बोलावतात. व त्यांचे यश बघून माझे मन सुखावते. हा कार्यकर्त्यांचा ओघ निव्वळ महाराष्ट्रातूनच नाही तर मध्यप्रदेश, कर्नाटक, राजस्थान, तोलंगणा या राज्यांमधूनही येतो. तिथले राजकारणीही माझे शिरपूरचे काम बघायला येतात व आमच्या राज्यातही असेच काम आम्ही करु असे वचन देवून परततात.

माझे मनात एक प्रश्न निर्माण झाला. खानापूरकर हे कट्टर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक कट्टर कार्यकर्ते. श्री. मोहन भागवतांसमवेत तृतीय वर्षाचा अभ्यास पूर्ण करणारे खंदे स्वयंसेवक. असे असतांना काँग्रेसचे श्री. अमरिशभाई पटेल यांचे बरोबर काम करायला कसे तयार झाले? त्यांनी शिरपूर हे कार्यक्षेत्र निवडले यासाठी श्री. अमरिशभाई पटेल हे कारणीभूत आहेत. त्यांनी खानापूरकर सरकारी सेवेत असतांना धुळे जिल्ह्यातील त्यांचे काम बघितले आणि त्यांना ऑफर दिली की तुम्ही सरकारी सेवा सोडून माझेकडे या, आपण दोघे मिळून शिरपूरचा काय़ापालट करु. त्यांनी या ऑफरला नकार दिला आणि मी निवृत्त झाल्यावर तुमच्या ऑफरचा विचार करीन असे आश्वासान दिले. निवृत्ती नंतर त्यांची पुन्हा भेट झाली. खानापूरकर त्यांना म्हणाले, मी हाडाचा स्वयंसेवक, तुम्ही काँग्रेसचे कार्यकर्ते, आपले कसे जमणार? ते म्हणाले, आपल्या दोघांचा उद्देश एक आहे., त्यात आपले राजकीय विचार त्यामध्ये येणार नाहीत याची काळजी मी घेईन. खानापूरकरांनी आणखी एक विनंती केली. एक वर्षभर मी प्रत्यक्ष काम करणार नाही, फक्त परिसराचा अभ्यास करीन. तीही अट अमरिशभाईंनी मान्य केली.

त्यांचा अभ्यास सुरु झाला. त्यांनी सर्व खाचखळगे शोधून काढले व मगच प्रत्यक्ष कामाला सुरवात केली. अमरिशभाईंनी पैसा कमी पडू दिला नाही, खानापूरकरांनी कामात कुचराई केली नाही आणि त्यातून उभा झाला शिरपूर पॅटर्न. त्यांचे काम प्रत्यक्ष जेव्हा सुरु झाले तेव्हा स्थानिक जनतेने त्यांना खूप विरोध केला. बरेचदा अपमानित होवून गावातून बाहेर जावे लागले. पण ते मागे हटले नाहीत. आणि जेव्हा यश दिसायला लागले तेव्हा तेच लोक पुढे आले आणि गावोगाव त्यांचा सत्कार करायला लागले.

त्य़ांच्या आयुष्यात एक विलक्षण योगायोग आला. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण शिरपूरला आले असतांना खानापूरकरांनी त्यांना कामाला भेट देण्याची विनंती केली. काही मिनिटांची भेट ठरली पण जेव्हा काम बघायला सुरवात झाली तेव्हा तीन तासापेक्षा जास्त वेळ त्यांनी काम पाहतांना व्यतीत केला. त्याचा खानापूरकांना मोठा लाभ झाला. राज्यसरकारच्या दोन्ही सदनांसमोर व सर्व महत्वाच्या सचिवांसमोर आपले प्रझेंटेशन सादर करण्याची संधी त्यांना लाभली. हा मान राज्यातील फक्त एकाच व्यक्तीला मिळत असतो. ती व्यक्ती म्हणजे राज्याचे राज्यपाल. प्रेसेंटेशन अत्यंत प्रभावी झाले.

सरकार याचा लाभ घेईल अशी खानापूरकरांना आशा निर्माण झाली. पण दुर्दैव आडवे आले. काही दिवसातच मुख्यमंत्र्याची उचलबांगडी झाली आणि मनातले मांडे मनातच राहिले.

आज शिरपूरचा शेतकरी सुखी आणि समाधानी आहे. महाराष्ट्रात जेव्हा पाण्याचा दुष्काळ पडतो तेव्हा सर्त्र हाःहाकार माजतो पण शिरपूरमधील पिके आनंदाने डोलत राहतात. तिथले शेतकरी आता वर्षातून दोन पिके घ्यायला लागले आहेत. पूर्वी ते हलकी पिके घेत असत आता मात्र पीक निवड बदलली आणि समृद्धते कडे नेणारी पिके घ्यायला सुरवात जाली. त्यामुळे घरोघरी समृद्धी दिसायला लागली. मी तेथील बऱ्यांच शेतक–यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. त्यावेळी माझ्या लक्षात आले की तिथल्या शेतकऱ्यांच्या राहाणीत बराच बदल झाला आहे. काही जणांनी पक्की घरे बांधून घेतली आहेत. काहींनी घरावर मजला चढवलेला आहे. काहींच्या घरासमोर ट्रॅक्टर, मोटारगाडी, मोटर सायकल उभी दिसली.

कापूस या पिकाचे वैशिष्ट्य आहे. मे महिन्याच्या शेवटी कापसाची पेरणी झाली म्हणजे कापसाचे पीक चांगले येते. नंतर कापसावर ज्या किडी पडत असतात त्यांचे प्रमाण कमी होते. भरघोस उत्पादन येते. ज्यावेळी राज्यात इतर ठिकाणी कापसाची पेरणीही झालेली नसते तेव्हा शिरपूर परिसरातील शेतीत कापूस दीड ते दोन फूट वाढलेला असतो. पाऊस पडला नाही तरी शेतकरी मे महिन्याचे शेवटी जमीन ओलवून कापसाची लागवड करतात. गेली कित्येक वर्षे खानापूरकर मला कापसाची वाढलेली रोपे दाखविणारे फोटो मला पाठवत असतात तेव्हा मन भरुन येते.

सध्या ते एका आगळ्यावेगळ्या प्रयोगात मग्न आहेत. आपल्याला विदर्भातील खारपण क्षेत्राचा पट्टा माहित असेलच. अकाला, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यात भूजल खारावलेले आहे. ते पाणी शेताला देता येत नाही. त्यामुळे जमीन सुपीक असून सध्या तिथले शेतकरी त्याचा लाभ घेवू शकत नाहीत. सरकारने आता पर्यंत हा दोष दूर करण्यासाठी बरेच प्रयत्न केले पण यश आले नाही. हा पट्टा सध्या त्यांना आकर्षित आह. हे आव्हान त्यांनी पेलायचे ठरविले आहे. प्राथमिक अभ्यास करण्यासाठी त्यांनी आतापर्यंत बऱ्याच फेऱ्या तिथे मारल्या आहेत. अभ्यास पूर्ण झाला आहे. यश येईल याची त्यांना आता खात्री पटली आहे. त्यांचे म्हणणे आहे की या खारपाण पट्ट्यात पिवळ्या मातीचे थर ठराविक क्रमाने आहेत. हे थर पावसाच्या पाण्याला जमिनीत मुरु देत नाहीत. येथेही त्यांची अँजिओप्लास्टीची कल्पना वापरुन हा थर ओलांडला तर पावसाचे पाणी जमिनीत शिरुन परिस्थितीत फरक पडण्याची शक्यता आहे असे त्यांचे मत आहे. तिथल्या राजकारण्यांना हाताशी धरुन या कामासाठी पैसा उभारण्याची तयारी चालू आहे. हा प्रयोग यशस्वी ठरला तर ते विदर्भावर उपकारच ठरतील.

शिक्षणासाठी घरोघर पेपर वाटणारा मुलगा येथ पर्यंत पोहोचू शकतो हे त्यांनी दाखवून दिले आहे. लहानपणी त्यांनी एक भाषण ऐकले होते त्यात भूजल शास्त्राची संकल्पना त्यांचे समोर आली. भविष्यात मी भूगर्भ जल शास्त्रज्ञ होईन ही शपथ त्यांना घेतली होती. आज त्या स्वप्नपूर्तीचे समाधान त्यांच्या चेहेऱ्यावर दिसत आहे.

त्यांचे उर्वरित आयुष्य सुखाचे , समाधानाचे व भरभराटीचे जावो ही सदिच्छा व्यक्त करुन येथे थांबतो.

*****

## गौरव भगिरथाचा

खरंच आज वाटतय थोडं फार भरून पावलोय
मनांत दाटलेल्या भावनांना वाट करून देतोय
आपणांस वास्तविक बरंच काही द्यायचं राहिलय
समजू नका मला यातलं सर्व काही आलय

प्रसंग हा अभिमानाचा सौख्याचा अन् आनंदाचा
तुमचीच नव्हे तर आमचीही छाती फुलण्याचा
ध्येय गाठण्यासाठी दृढ निश्चय ठाम करण्याचा
कार्यापासून आपल्या किंचित नवप्रेरणा घेण्याचा

नसेल पाणी तरच पाण्याची किंमत कळते
चमत्कार पाहण्यास शिरपूर कडे पाऊल वळते
दुर्भिक्ष्य जलाचे मनांत कुठेतरी सलते
भीषण वास्तव ऐकून पाण्याची महती कळते

सर्वत्र नांव ह्या ईश्वरीय कार्याचे जाहले
आप्तस्वकीयांनी तुलाच हे पुष्प वाहले
ह्या गुच्छांत नकळत कांटे असतील राहिले
तुझ्याच ठायी आम्ही भगिरथास पाहिले

घे स्वीकारून अमुच्या लक्षलक्ष शुभेच्छा
तुझ्या हीतून कार्य घडावे हीचज तर श्रींची इच्छा

**.....जयंत**



## श्री. खानापूरकर यांना मिळालेले विविध पुरस्कार

(१)महाराष्ट्र सिंचन सहयोग : सिंचन मित्र पुरस्कार
(२)योग विद्या धाम, शिरपूर : समाज सेवक सन्मान
(३)वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान, पुसद : वसंतराव नाईक जलसंधारण पुरस्कार २०१३
(४)निसर्ग मित्र समिती धुळे : निसर्ग मित्र पुरस्कार
(५)रोटरी क्लब, दोंडाइचा : श्रमसाफल्य पुरस्कार
(६)इव्वा : एस. पी. उज्वला मेमोरियल पुरस्कार
(७)महाकाली शिक्षण संस्था, वर्धा : वसुंधरा तृप्ती पुरस्कार
(८)सिनिक ग्रूप निसर्ग मित्र समिती: राष्ट्रीय सिनिक जलमित्र पुरस्कार
(९)ए.बी.पी. माझा : ए.बी.पी. माझा सन्मान पुरस्कार २०१३
(१०)वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठान. मुंबई : वसंतराव नाईक जलसंधारण पुरस्कार.
(११)आय.बी. एन लोकमत : पाणीदार पुरस्कार
(१२)आर्ट ऑफ लिव्हिंग, जळगाव : मानपत्र
(१३)शा. मा. चव्हाण प्रतिष्ठान धुळे : जाणीव परस्कार
(१४)दी एज्युकेशन सोसायटी अंबरनाथ : दधिची पुरस्कार
(१५)सौ. जीजाबाई सेवा प्रतिष्ठान जळगाव : महात्मा फुले सेवाव्रती पुरस्कार
(१६)किर्लोस्कर वसुंधरा फिल्म फेस्टीव्हल : वसुंधरा जीवन गौरव पुरस्कार
(१७)गिरणा गौरव प्रतिष्ठान नाशिक : गिरणा गौरव मानपत्र
(१८)जीवन विद्या मिशन परिवार, मुंबई : सद्गुरु श्री. वामनराव पै जीवनगौरव पुरस्कार
(१९)कमलाताई मराठे पुरस्कार समिती, साक्री : कमलाताई मराठे पुरस्कार
(२०)श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील ट्रस्ट नेमीनाथनगर, सांगली : स्वर्गीय नेमगोंडा दादा पाटील जनसेवा पुरस्कार २०१६
(२१)निसर्ग मित्र समिती, सहकारी बँक, दोंडाईचा : हस्ती जलमित्र पुरस्कार
(२२)यु. आर. एल. फाउंडेशन मुंबई : सामाजिक गौरव पुरस्कार
(२३)रोटरी क्लब ऑफ सिंदखेडा : खानदेश रत्न पुरस्कार
(२४)महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ नांदेड : शंकरराव चव्हाण गुरुरत्न पुरस्कार
(२५)साद माणूसकीची फाउंडेशन : सन्मान चिन्ह.

# अवकाशप्राप्त चिरतरुण

**श्री. हरीश बुटले**

**मो : ९४२२००१५६०**



**जलतज्ज्ञ आणि ज्येष्ठ भूगर्भशास्त्रज्ञ :**

सुरेश खानापूरकर साहेब या नावाच्या बाबतीत एक वेगळच आकर्षण असतानाच्या दिवसात ही व्यक्ति कशी असेल त्याविषयी मनामध्ये खूप वेगवेगळ्या कल्पना होत्या. मात्र ज्यावेळी त्यांची भेट झाली त्यावेळी हे गृहस्थ म्हणजे वरून नारळ आणि आतून ओल्या खोबऱ्यासारखी मऊ वाटली. मला अजूनही तो दिवस आठवतो. त्यांच्या घरी भेटायला गेलो त्या दिवशी त्यांची हसतमुख लहान मूर्ती बघून पहिल्याच भेटीत त्यांच्याविषयी असलेल्या कल्पनांना फाटा मिळाला. एवढ्या मोठ्या उंचीचा माणूस एवढा साधा असू शकतो यावर विश्वास बसेना. मी त्यांच्याकडे येण्याचे प्रयोजन सांगितल्यावर जवळपास अडीचतासांची चर्चा आणि माझी मेहनत वाया जाईल की काय असे वाटू लागले. त्याचं कारण म्हणजे NGO विषयी त्यांच्या मनात असलेला राग. ते काहीही केल्या त्यांचे जे अनुभव होते त्या अनुभवाच्या बाहेर जाऊन विचार करायला तयारच नव्हते. मात्र मी माझी जिद्द सोडली नाही आणि पहिल्याच भेटीत अनेक दाखले देत त्यांचा माझ्या कोठारी गावातील सादग्राम निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रमांत येऊन गावाच्या पाणीसमस्येबद्दल मार्गदर्शन करावं ही विनंती त्यांना अखेर मान्य करावी लागली. त्यांना त्यांची फी आणि जाण्यायेण्याचे प्रवासाच्या तिकिटांचा खर्च विचारला. त्यावेळी माझ्या मनात विचार आला की आपण एवढ्या चांगल्या भावनेने आपल्या गावासाठी काहीतरी करायला निघालो आणि यांच्यासाठी एवढा खर्च कसा परवडायचा ? पण मी मनाचा निग्रह केला की त्यांना कसेही करून आपल्या गावात मार्गदर्शनासाठी न्यायचे. आणि मग ठरलं की ते ३ दिवसांसाठी कोठारीला येतील. मी तोपर्यंत पाहुण्यांचा येण्याजाण्याचा खर्च करायचो पण मानधन या विषयाला कधीही हात घातला नव्हता, यावेळी तो करावा लागल्याची खंत



मनामध्ये होती मात्र या पहिल्या भेटीचे रूपांतर प्रेमळ मैत्रीत होईल याची त्या वेळी कल्पनाही केली नसताना जे दान पदरी पडलं ते फार मोलाचं होतं.

आदारणीय खानापूरकर साहेब कोठारीला आले आणि सादग्राम निर्मितीची एकूण प्रक्रिया बघून एवढे रममाण झाले की त्यांचे ३ दिवस कसे निघून गेले ते त्यांना कळलेच नाही. या तीन दिवसात ते कार्यकर्त्यांमध्ये आणि गावातील इतर सदस्यांमध्ये एवढे रमून गेले की त्यांना त्या ९ दिवसांच्या शिबिरातील एकही दिवस चुकवावा असे वाटत नव्हते, मात्र दरम्यानच्या काळात त्यांना एका पाणी परिषदेसाठी पुण्याला जाणं गरजेचं असल्याने ते परत गेले, मात्र लगेचच शेवटच्या ३ दिवसांसाठी ते परत कोठारीला आले. त्यांच्या डोक्यात असलेली NGO बद्दलची भावना आमच्या बाबतीत कुठच्या कुठे विरुन गेली होती. १५ जानेवारी ते २३ जानेवारी २०१९ या कोठारीतील अविस्मरणीय अश्या सादग्राम निर्मिती प्रशिक्षासाठी मार्गदर्शक म्हणून आलेल्या खानापूरकर साहेब माझ्यासाठी सुरेश काका कधी झाले ते कळलेही नाही आणि आपासुखच आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी ते खानापूरकर काका झाले.

हा एवढा बदल मी पहिल्या भेटीच्या केवळ २०–२५ दिवसात अनुभवत होतो. स्वतःला झळ सोसून सामाजिक काम करणारी ही संस्था बघून त्यापुढील काळात कधीही कोणतीही अपेक्षा न करता अनेक कार्यक्रम, दौरे आणि सभा समारंभ त्यांनी साद माणुसकीची या आमच्या ग्रामविकासासाठी कटिबद्ध असलेल्या संस्थेसाठी केले.

तीन वर्षातील कोरोनाचा दीड वर्षाचा कालावधी वगळता जेमतेम दीड वर्षाच्या कालावधीतील हा स्नेह कमालीचा वृद्धिंगत झाला, त्यात सुरेश काकांच्या विविध पैलूंचे दर्शन झाले. त्यांच्यासोबत झालेल्या अनेक भेटीगाठी, कार्यक्रम, दौरे आणि सभा समारंभ यांच्यातून त्यांच्याविषयी त्यांच्या ७५ व्या वर्षीच्या या विशेष अंकात ७५ पाने लिहिले तरी अपुरे पडतील एवढे अनुभव गाठीशी आहे.

त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग आणि काही विशेष अश्या वाक्यांसहित त्यांच्या मार्गदर्शनाची भाषणं मला पाठ झाली आहेत. लहानपणी त्यांनी केलेला संघर्ष आणि त्यातही त्यांचा करारी बाणा संपूर्ण आयुष्यात त्यांनी जपला आहे. एक भूगर्भशात्रज्ञ आणि जलतज्ज्ञ म्हणून त्यांची ख्याती देशभर आहे. आपल्या कामप्रती एखादा माणूस किती समर्पित असू शकतो त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे सुरेश काका.! त्यांची त्यांच्या विषयावरील पकड आणि त्याच्या बारकाव्यामध्ये




शिरण्याची त्यांची हातोटी कमालीची प्रेरणादायी आहे. माणसाने आपल्या कामाच्या दर्जाविषयी किती आग्रही राहावं हा परिपाठ त्यांच्याकडून शिकण्यासारखा आहे. त्यांच्याविषयी खूप आस्था असण्याचे दुसरे कारण म्हणजे अनेक बाबतीत त्यांची आणि माझी विचारांची बैठक समान आहे. केवळ ज्या चार दोन गोष्टींमध्ये त्यांचे आणि माझे जे मतभेद असतात ते आमच्या दोघांच्याही जीवनाच्या स्थायीभावाचे लक्षण आहे. त्यांना प्रत्येक गोष्ट ही यशाच्या एकाच साच्यातून बघायची सवय झाली आहे. त्यामुळे अपयश पचवण्याची किंवा टीका सहन करण्याची त्यांची तयारी नाही, तर मी नेहमीच यशापायशाचा सारीपाट मांडून एकेक घर पुढे सरकण्यासाठी प्रयत्नवत असतो.

शिरपूर पॅटर्न ज्या पद्धतीने त्यांनी घडवला ते कार्य म्हणजे वास्तवात उतरलेले असले तरी डोळ्याने बघितल्याशिवाय कोणालाही विश्वास बसणार नाही असे अजोड आणि कल्पनातीत आहे. त्यांची आपल्या सहकाऱ्यांकडून काम करून घेण्याची शैली प्रत्येकाने आत्मसात करण्यासारखी आहे. मात्र प्रत्येक काम शिरपूर पॅटर्न प्रमाणे झाले पाहिजे हा त्यांचा आग्रह बरेचदा त्यांच्या कामाची व्यापकता वाढण्याच्या दृष्टीकोनातून अडचणींचा ठरतो हे वारंवार लक्षात येऊनही ते त्यांच्या भूमिकेवर ठाम असतात याचेच कौतुक वाटते.

सुरेश खानापूरकर काका हे जल व्यवस्थापनातील तज्ज्ञ आहेत, त्यांनी तयार केलेल्या शिरपूर पॅटर्न हा आता केवळ राज्यातच नव्हे तर देशांमध्ये सर्वांच्या चर्चेचा विषय आहे. आजपर्यंत अनेक गावांनी आणि संस्थांनी शिरपूरला भेट दिलेली आहे. खानापूरकर साहेबांनी तयार केलेले त्यांचे कार्यकर्ते अतिशय तन्मयतेने संपूर्ण प्रक्रियेची माहिती देत असतात. ही माहिती देत असताना खानापूरकर साहेबांनी ज्या पद्धतीने या संपूर्ण कामाची जबाबदारी वाहिली आणि या कामाला एक मूर्त रूप दिलं त्याविषयी ते भरभरून बोलत असतात. अर्थातच शिरपूरचे माननीय आमदार अमरीश भाई आणि भूपेशभाई पटेल या दोघांचं फार मोठं पाठबळ त्यांच्या या कामाच्या पाठीशी आहे आणि त्यामुळेच हे काम प्रत्यक्षात उतरू शकलं. अर्थातच या गोष्टीची जाणीव खानापूरकर साहेबांना आहे आणि ते त्याबद्दल नेहमी कृतज्ञता व्यक्त करतात.

साद माणुसकीची फाउंडेशन च्या बाबतीतही सादग्राम निर्मिती प्रक्रियेच्या विषयी आवड निर्माण झाली तेव्हापासून ते सातत्याने विविध गावांमध्ये आमच्यासोबत सादग्राम निर्मिती प्रशिक्षणाच्या दरम्यान आलेले आहेत. यावेळी कधीही त्यांचं मोठेपण आणि त्यांची असलेली या कामातील उंची कधीही आड आलेली नाही. ते अतिशय शिस्तबद्धपणे आणि समर्पित वृत्तीने या प्रक्रियेत सामील झाले. त्यामुळेच सादग्राम निर्मितीतील अनेक कार्यकर्त्यांचे ते मार्गदर्शक म्हणून आजही सर्वांना मार्गदर्शन करत असतात. कोठारी मध्ये तर त्यांनी त्यांच्या संपूर्ण क्षमतेने केवळ तीन दिवसांमध्ये संपूर्ण पाणलोट पालथा घालून त्याविषयी एक रिपोर्ट सादर केला आणि तो रिपोर्ट आठव्या दिवशी सादग्राम निर्मिती प्रशिक्षणाच्या दरम्यान चंद्रपूर जिल्ह्याच्या सीईओंना सादर केला. कोठारी गावामध्ये आणि शिवारामध्ये वारंवार येणाऱ्या पुराच्या बाबतीत कसा बंदोबस्त करता येईल याविषयी त्यांनी सखोल मार्गदर्शनही केलं आणि त्याप्रमाणे पुढील कारवाईची दिशा कशी राहू शकेल या संदर्भातली माहिती दिली. अर्थातच ते काम खूप मोठं असल्याने आणि त्याच्यासाठी सरकारी शक्ती खर्ची लागत असल्यामुळे त्या कामावर अजूनही म्हणावी तशी प्रगती झालेली नाही. त्यानंतर जवळपास दीड वर्ष कोरोनाच्या सावटाखाली गेल्यामुळे तसेही त्या कालावधीत कोणतं काम करणं शक्य नव्हतं. मात्र आता यापुढे त्यांनी दिलेल्या मार्गदर्शना अनुरूप गावाच्या पाणलोटाच्या दृष्टिकोनातून काय करता येईल त्या संदर्भात संबंधित ग्रामपंचायती मिळून कार्यवाही लवकरच सुरू करतील अशी आशा करू.

साद माणुसकीची फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनासाठी शिरपूर भेटीच्या वेळी त्यांनी शिरपूरच्या मॅनेजमेंट कॉलेजमध्ये राहण्याची आणि जेवणाची विशेष अशी सोय केलेली होती. ज्यावेळी आदर्श गावांचा दौरा करण्याची वेळ आली त्यावेळी त्यांनी सर्व सहभागी सदस्यांसोबत पाटोदा, हिवरे बाजार, राळेगणसिद्धी, निढळ या गावांना सर्वांसोबत भेटी दिल्या.



दरम्यानच्या काळात राज्यात दुष्काळाचे सावट होते. त्यावेळी काही जिल्ह्यात दुष्काळ का पडतो आणि त्यावेळी झालेली जलयुक्त शिवाराची जलसंधारणाची कामे किती प्रमाणात प्रभावीपणे झाली ते तपासून पाहण्याकरीता आदरणीय दि मा मोरे साहेब, दत्ता देशकर साहेब, खानापूरकर साहेब आणि मी आम्ही चौघे मिळून पुणे, नगर, औरंगाबाद, जळगाव आणि धुळे जिल्ह्याचा अभ्यास दौराही केला. या दौऱ्यादरम्यान खूप खोलवर जाऊन एखाद्या परिस्थितीचे कसे विश्लेषण केले जाते त्याची अनुभूती आली. पुढे त्याचाच परिपाक म्हणून साद माणुसकीची फाऊंडेशनच्या व्यासपीठावरून पाणीप्रश्नविषयक चर्चासत्र आयोजित केले त्यात आदरणीय सुरेश काकांनी बीजभाषण करून उत्तम अशी सुरुवात करून दिली.




सुरेश काकां केवळ कामापुरतेच वाहून घेतात असे नाही तर ते उत्तम असे कुटुंबवत्सल व्यक्ती आहेत. बऱ्याच वेळा कामानिमित्त महिन्यातून बाहेर जावं लागतं. तरीपण त्यांना त्यांच्या कुटुंबात जो वेळ घालवायचा आहे तो ते नक्की घालवतात. त्यांची दोन्ही मुलं आता सुस्थितीत आहेत, त्यामुळे त्यांना पारिवारिक अशा कोणत्याही चिंता नसल्याने त्यांना त्यांच्या या वयात देखील तरुणाला लाजवेल अशी चपळता आणि कार्यकुशलता त्यांच्यामध्ये आहे. आम्हाला नेहमीच आश्चर्य वाटत आलेलं आहे की या वयात देखील सुरेश काका एवढे कार्यतत्पर कसे ? वेळेच्या बाबतीमध्ये ते फार काटेकोर आहेत आणि दिलेले काम वेळेतच करून देणे किंवा त्याचप्रमाणे झाले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असतो. ते करण्यासाठी त्यांच्या कामकाजासाठी असणाऱ्या प्रत्येक बाबतीत अतिशय बारीकसारीक तपशील ते लिहून काढत असतात आणि संबंधित व्यक्तीपर्यंत ते वेळेच्या आधीच पोहचवून ठेवतात. म्हणजे चर्चा करतांना त्यांचा कोणत्याही प्रकारचा वेळेचा अपव्यय होणार नाही यासंदर्भात काळजी घेतात. माझ्यासोबत महाराष्ट्रात किमान सात आठ वेळा ते दौऱ्यावर आलेले आहेत आणि त्याचबरोबरीने त्या दौऱ्यादरम्यान त्या गावांकडून त्यांनी कोणत्याही मानधनाची अपेक्षा न करता मार्गदर्शन केलेले आहे. त्यामुळे प्रथम भेटीतच एवढे कठोर वाटत असलेले सुरेश काका पुढील सर्व वाटचालीत ते अतिशय प्रेमळ वाटायचे.

असे हे अवकाश प्राप्त तरुण भूगर्भशास्त्रज्ञ आणि जलतज्ज्ञ वयाच्या ७५ व्या वर्षाला गवसणी घालत शंभरीकडे वाटचाल सुरू करत आहेत. अश्या या लढवैय्या आणि चिरतरुण व्यतिमत्वाला अमृत महोत्सव प्रसंगी डीपर, सर फाउंडेशन, तुम्ही आम्ही पालक मासिक आणि साद माणुसकीची परिवारातर्फे खूप खूप शुभेच्छा !

*****





# एका दृष्टीक्षेपात शिरपूर पॅटर्न:

(१) किती गावांना लाभ झाला : ६६

(२) किती शेतकऱ्यांना लाभ झाला : २,१८,४१९

(३) किती बंधारे बांधले गेले : २३५

(४) कामासाठी शेतकऱ्यांनी किती जमीन दान केली : ४,१०९५२ चौरस मीटर

(५) नाल्यांचे केलेले खोदकाम : ६८,४९२ मीटर

(६) किती पाणी अडवले गेले : १०५५५.७० टीसीएम

(७) जमीनीत मुरलेले पाणी : २११११ टीसीएम

(८) किती जास्तीची जमीन पाण्याखाली आली :१०,५५५ हेक्टर

(९) शेतकऱ्यांचे वाढीव वार्षिक उत्पन्न : ९,४४० लाख रुपये

(१०) झालेला एकूण खर्च : १८८ लाख रुपये

(११) लाभ: खर्च गुणक : ५०.२

(१२) महाराष्ट्रात किती जिल्ह्यात शिरपूर पॅटर्नच्या धरतीवर काम चालू आहे : २१ जिल्हे

(१३) महाराष्ट्राबाहेर किती राज्यात शिरपूर पॅटर्नच्या धरतीवर काम चालू आहे : ३ राज्ये

जलसंवाद REGISTERED PERIODICAL
Postal license no.PCW/108/2021-2023/2020 (Posting at Ganeshkhind SO on 10th of every month)
RNI No. MAHMAR/2012/41686.DECL No. SDM/HAVELI/SR/07/2018 ISBN No. 978-81-924949-0-6




To learn more, log on to kitchensteps.spacewood.in

SPACEWOOD®

98230 72803

**Klassy Furnishers Pvt. Ltd.**

Plot No. 11, Behind Air India Building,
Town Center, CIDCO, Jalna Road, Aurangabad.
www.klassyfurnishers.com

प्रकाशक व मुद्रक: डॉ. दत्ता देशकर
फोन: 09325203109
jalasamvad@gmail.com
dgdwater@gmail.com
जलसंवाद प्रकाशन
अे-201, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंट्स, पॅनकार्ड क्लबजवळ,
बाणेर हिल्स, बाणेर, पुणे 411 045